मंगळवार, ७ नोव्हेंबर २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - ९२
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) TUESDAY 7 NOV. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-03 ●ISSUE-92 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-10 ●PRICE-5

# बीडमधील हिंसाचार पूर्वनियोजित

## छगन भुजबळ : ओबीसीमधून मराठा आरक्षणाला तीव्र विरोध

आधुनिक केसरी न्यूज

**बीड : बीडमधील हिंसाचार हा पूर्वनियोजित कट होता आणि राज्याच्या गुप्तचर खात्याचे ते अपयश असल्याचा दावा राज्याचे मंत्री छगन भुजबळ यांनी केला. जयदत्त क्षीरसागर हे फक्त ओबीसी समाजाचे असल्याने त्यांच्या घरावर हल्ला करण्यात आला असल्याचेही ते म्हणाले. तसेच ओबीसीमधून मराठा आरक्षणाला तीव्र विरोध असल्याचा पुनरूच्चारही त्यांनी केला.**



भुजबळ म्हणाले की, मी बीड आणि माजलगाव गेलो होतो. मी किंवा माझ्या पक्षाने आरक्षणाला विरोध केला नाही.आम्ही हे म्हणतो की, आमच्या आरक्षणाला धक्का न लावता द्या. ओबीसीमध्ये छोट्या जाती आहेत, त्यात मराठ्यांना काही मिळणार नाही. जी आमची भूमिका तीच शिंदे, शरद पवार, फडणवीस यांची आहे. हे आंदोलन सुरू झाले त्यात प्रचंड नासधूस केली. सुभाष राऊत यांच्या हॉटेलमध्ये सर्वात जास्त नुकसान झाले. आमदार प्रकाश सोळंके यांच्या घरावरील हल्यानंतर मी सांगितले होते की हॉटेलला संरक्षण द्या. सोळंके यांच्या घरातील हल्ल्यावेळी कोयते, पेट्रोल बॉम्ब सोबत होते. जयदत्त क्षीरसागर, संदीप क्षीरसागर यांच्या घरातील हल्ल्यात घरचे सापडले तर वाचले नसते. प्रत्येकाला सांकेतिक नंबर दिला होता. हे ठरवून होते, अचानक घडले नव्हते. या नेत्याला हा नंबर दिला होता. सोळंके बोलतात हे खरे आहे. आरक्षणाने सर्व प्रश्न सुटतील असे नाही, जे प्रकाश सोळंके म्हणाले त्यात गैर काय? पोलीस हतबल का झाले याची चौकशी व्हावी. पोलिसांना माहिती नव्हती का, त्यांच्याकडे शस्त्र होते, काठ्या होत्या, थोडा तरी प्रतिकार करायला हवा होता.

मराठा आरक्षणाला आम्ही कधीच विरोध केला नाही. मात्र, कोणत्याही आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला वेगळं आरक्षण देण्याची मागणी मागणी आहे. ओबीसीमध्ये अनेक छोटे-छोटे जाती आहेत. त्यामुळे मराठा समाजाला ओबीसीमध्ये घेतल्यास कोणालाही याचा फायदा होणार नाही. आमची जी भूमिका आहे तीच शरद पवार, अजित पवार आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह सर्वच पक्षाची आहे. ओबीसी समाजाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण देण्याची मागणी सर्वांची आहे, असेही छगन भुजबळ यावेळी म्हणाले.

**हिंसाचाराचे समर्थन आम्ही कधीही केलेले नाही** : जातीवर किंवा कुठल्या विशिष्ट लोकांवर हल्ले केलेले नाहीत. उद्रेक, जाळपोळ करायची नाही ही आमची भूमिका आहे. हिंसाचाराचे समर्थन आम्ही कधीही केलेले नाही, असे मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले आहे. चांगली घटना जिथे घडली नाही तिथे जात आणून चालत नाही. आमच्याकडेही काही गोष्टी घडल्या तिथे कुठे कुणी आले? असा प्रश्न छगन भुजबळ यांना उद्देशून मनोज जरांगे पाटील यांनी विचारला आहे. कुठलाही हल्ला, जाळपोळ कशाचंही समर्थन आम्ही करत नाही.

माणसाने थोडसे भानावर येऊन बोलले पाहिजे. साखळी उपोषण करणारे मुले, शांततेत आंदोलन करणारी मुले घरी परतल्यानंतर मराठा समाजाचे आंदोलन बदनाम व्हावे म्हणून काही गोष्टी केल्या गेल्या. शांततेत आंदोलन करणाऱ्यांना टार्गेट केले जाते. साखळी उपोषण करणाऱ्यांना उचलून नेत आहेत. आम्ही त्यांच्याबद्दल बोललो आहेत. ओबीसींचे आरक्षण संपवायचे आहे, असे भुजबळ म्हणाले आहेत पण त्यांचे आरक्षण कसे काय संपणार? आयोगाच्या माध्यमातून जे मराठा समाजाचे हक्काचे आहे तेच द्या म्हणतोय. आम्ही कुणाचेही आरक्षण काढा म्हणत नाही, असेही जरांगे पाटील म्हणाले. जातनिहाय जनगणना करायची ही मागणी भुजबळ करत आहेत म्हणजे ज्याच्या विहिरीत पाणी त्यानेच असे बोलावे असा प्रकार आहे. जातनिहाय जनगणना करायची असेल तर जरुर करा आमचे काही म्हणणे नाही असेही जरांगे पाटील म्हणाले. छगन भुजबळ आता पातळी सोडून बोलू लागले आहेत असेच म्हणावे लागेल.

मी सरकारला आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना आवाहन करतो की या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करा. आमचे आरक्षण आत्तापर्यंत तुम्हाला दिले होते. आम्हाला आणि सरकारला लक्षात आले आहे की आमचे आरक्षण तिथे आहे त्यामुळे आम्ही आमचा हक्क मागतो आहे असंही जरांगे पाटील म्हणाले आहेत. आमचेच आरक्षण आहे पण द्यायचे नाही म्हणून हा सगळा कांगावा चालला आहे, असेही जरांगे पाटील पत्रकारांना म्हणाले.

# विकासकामांपेक्षा जीव महत्त्वाचा; प्रदूषणावर हायकोर्ट आक्रमक

आधुनिक केसरी न्यूज


**मुंबई :** दीपावलीनिमित्त हवेची गुणवत्ता उत्तम राखण्यासाठी हायकोर्टाने सोमवारी आक्रमक भूमिका घेतली. विकासकामांपेक्षा लोकांचा जीव महत्त्वाचा असून काही दिवस बांधकामे बंद राहिले तर आभाळ कोसळणार आहे का? असा सवाल हायकोर्टाने आज सुनावणी दरम्यान केला. मुंबई महापालिकेने विनंती केल्यानंतर हायकोर्टाने चार दिवसांचा अल्टिमेटम दिला आहे. चार दिवसात हवेची गुणवत्ता चांगली न झाल्यास बांधकामावर बंदी घालण्याचा निर्णय घेतला जाईल, असेही हायकोर्टाने म्हटले.

बांधकाम बंदीबाबत प्रशासनाला हायकोर्टाकडून अखेरची संधी देण्यात आली असल्याचे कोर्टाने स्पष्ट केले आहे. येत्या शुक्रवारपर्यंत हवा गुणवत्ता निर्देशांकात सुधारणा न झाल्यास दिवाळीचे चार दिवस बंदी लागू करणार असल्याचे हायकोर्टाने म्हटले. बांधकामातील डेब्रिज वाहून नेणारी वाहने ताडपत्रीने पूर्णपणे झाकणे बंधनकारक असून फटाक्यांवर बंदी घालण्याची इच्छा नाही, असे सांगताना कोर्टाने घालून दिलेल्या निर्देशांच काटेकोर पालन करा, असेही हायकोर्टाने सांगितले. मुंबई महापालिका आणि पोलिसांनी हे सुनिश्चित करावे की फटाके फोडण्याबाबत कोर्टाच्या नियमांचे पालन केले जाते की नाही. आवाज करणारे फटाके रात्री 7 ते 10 या वेळेतेच वाजवण्यास परवानगी देण्यात आली आहे. वेळेबाबत निर्धारित करून दिलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याचे हायकोर्टाने निर्देश दिले आहेत. मुंबईतील हवा प्रदूषणाबाबत आज हायकोर्टात सुनावणी झाली. मुंबईत दिवसेंदिवस खालवत चाललेल्या हवेच्या गुणवत्तेबाबत हायकोर्टात याचिका दाखल झाली आहे. परिस्थितीचं गांभीर्य पाहता हायकोर्टाने सुमोटो याचिका दाखल केली आहे. मुख्य न्यायमूर्ती देवेंद्रकुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती गिरीष कुलकर्णी यांच्या खंडपीठापुढे सुनावणी पार पडली. हायकोर्टानं या प्रकरणी जेष्ठ कायदेतज्ज्ञ दरायस खंबाटा यांना अमायकस क्युरी( कोर्टाचा मित्र) म्हणून नियुक्ती केली आहे. प्रशासनाने या विषयाकडे गांभीर्याने पाहात तातडीच्या उपाययोजना तात्काळ सुरू कराव्यात असे हायकोर्टाने आजच्या सुनावणी दरम्यान म्हटले.

मुंबईत खालावत चाललेली हवेची गुणवत्ता हा लोकांच्या जीवनमरणाचा प्रश्न बनला आहे. यावर आजच उपाययोजना केल्या नाहीत तर भावी पिढ्यांना याची मोठी किंमत मोजावी लागेल, अशी चिंताही यावेळी अमायकस क्युरी दरायस खंबाटा यांनी व्यक्त केली.










विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

विजय चौकात एक भव्य उंच चौथरा आपल्या दृष्टीस पडतो. याला राज्याभिषेक चौथरा असे म्हटले जाते. या राज्याभिषेक चौथऱ्याच्या बाजूला असलेल्या भिंतीवर सुंदर दृश्ये कोरलेली आपल्याला दृष्टीस पडतात. त्याला लागूनच दोन मजली भव्य हॉल आहे. राजघराण्यातील स्त्रियांना येथून राज्याभिषेक सोहळा पाहता येत असे. राजघराण्यातील स्त्रियांना राहण्यासाठी एका भव्य प्रसादाची निर्मिती केली गेली होती. त्याला झेनाना तटबंदी असे म्हणतात. या वास्तूच्या सरळ रेषेतील कमानी अत्यंत आकर्षक पद्धतीने बांधलेल्या आहेत. यात आपल्याला हिंदू आणि मुस्लिम संस्कृतीच्या वास्तुकलेचा मिलाफ बघायला मिळतो. जवळच कमळाच्या आकाराचा लोटस पॅलेस आजही उत्तम स्थितीत पाहायला मिळतो. राजघराण्यातील स्त्रियांचे अंघोळीचे ठिकाण म्हणजेच हमामखाना ही सुद्धा अशीच भव्य आणि सुंदर वास्तू. हत्तींना ठेवण्यासाठी एका विशाल अशा जागेची निर्मिती करण्यात आली होती. याच परिसरात एक गणपतीचे मंदिर आहे. त्याला सासवकेलू असे म्हणतात. ही मूर्ती मोहरीच्या दाण्यासारख्या दगडापासून बनवलेली आहे तर मुर्तीसमोरचा मूषक वेगळ्या दगडातून घडवलेला आहे. हजारा राम मंदिर हे हिंदू वास्तू पद्धतीने बांधलेले सुंदर मंदिर आहे. या ठिकाणी राजे पूजा करीत. या मंदिराच्या भिंतीवर रामायण, महाभारतातील अनेक प्रसंग कोरलेले दिसतात. विठ्ठल मंदिर हे हंपीतील भव्य आणि देखण्या मंदिरांपैकी एक. यालाच विजय विठ्ठल मंदिर म्हटले जाते. आता या मंदिराची दुरुस्ती सुरु आहे. या मंदिरात जाण्यासाठी आता बॅटरीवर चालणाऱ्या गाड्यांची व्यवस्था केली आहे. हा मंदिर परिसर अत्यंत विशाल आणि भव्य आहे. मंदिराचे कोरीव काम तर पाहतच राहावे असे आहे. महाराष्ट्राबाहेर असलेले हे विठ्ठलाचे मंदिर. इथे हा पंढरीचा ' कानडा राजा ' विराजमान आहे. मंदिराचे खांब तर अतिशय देखणे कोरीव काम केलेले आहेत. या खांबाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यातून संगीत निर्मिती होते.



## आनंदी पहाट

### देवाचं देवत्व देवपणात आढळते

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

जो आजपर्यंत दिसला नाही, कधीही दिसत नाही अशा निर्गुण निराकार देवाचा शोध घेणारी व्यक्ती स्वतःमध्ये देव असल्याचा शोध कधी घेते का? ज्याला देव म्हणायचं तो दिसतो कसा? असतो कोठे? नेमकं आपल्यासाठी काय करत असतो? हे काहीही माहिती नसताना केवळ पूर्वापार, परंपरागत चालू असलेल्या रूढीमुळे देव मानणं, त्याच्या चमत्काराच्या कारणास्तव नमस्कार करणं, ह्यापेक्षा आपण खरंच काही करतो का? का बरं इतर कोणत्याही बाबींची आपल्याला जाणीव होत नसते? अर्थात ह्यामध्ये एक स्तर असाही आहे कि जो अजिबात देव मानत नाही. देव आहे कि नाही, हा विषय जरी महत्वाचा असला अथवा नसला, तरीही देवत्व प्राप्त झालेलं आपल्या संपर्कात कोणी यावं, आपलं व्हावं, त्यानं आपल्याला आपलं म्हणावं, आपल्याला त्याचा सहवास लाभावा, एकूणच त्याच्याबरोबर सुख, समाधान आणि शांतीची अनुभूती यावी असं किती जणांना वाटत असेल? हा महत्वाचा विषय आहे.

आपल्याला नेहमीच जे आहे त्यात समाधान आणि आनंद मिळवण्यापेक्षा जे नाही त्याच्या शोधांत रममाण व्हावं असं वाटत असतं. निर्गुण निराकार असलेल्या देवाचं देवत्व शोधण्याचा केविलवाणा प्रयत्न करणारी व्यक्ती मात्र आपल्या आप्तेष्टांना, जेष्ठाना देव समजू शकत नाही, त्यांच्यात देवत्व शोधू शकत नाही. निर्गुण निराकार देवाची मनोभावे पूजा करणारे स्वतःच्या आई वडिलांची, घरातील जेष्ठ व्यक्तींची तितक्याच मनोभावे सेवा करू शकत नाही. हीच खरं तर त्यांच्यातील उणिव म्हणावी लागेल.



आधुनिक केसरी

**नांदे आत्माराम | सर्वांठायी ||**
**चंदनाचे अंगी | चंदनी सुगंध ||**
**तैसा ब्रह्मानंद | याचे ठायी ||१||**
**परीसाचे अंगी | लोहाचा उध्दार ||**
**तैसा हा आधार | जगताचा ||२||**
**मृगजळ कधी | भागवी का तृष्णा? ||**
**धावतो का मना | तैसा जगी ||३||**
**करावा निष्ठेने | कर्माचा जागर ||**
**टाकुनिया भार | विठुवरी ||४||**
**स्वधर्माचे अंगी | आनंदाचे धाम ||**
**नांदे आत्माराम | सर्वांठायी ||५||**




प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी

**देहास कांहीं दुःख जालें । अथवा क्षुधेनें पीडलें ।**
**तरी तें परम आक्रंदलें । परी अंतर नेणवे ॥४॥**
**माता कुरवाळी वरी । परी जे पीडा जाली अंतरीं ।**
**ते मायेसी न कळे अभ्यांतरीं । दुःख होये बाळकासीं ॥५॥**
**मागुतें मागुतें फुंजे रडे । माता बुझावी घेऊन कडे ।**
**वेथा नेणती बापुडें । तळमळी जीवीं ॥६॥**

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज


**भवसागर से तरण का, केवल सन्त अधार ।**
**मन मानी साधन करो, जीवन सकल असार ।।२८।।(स्वर्वेद तृतीय मण्डल अष्टम अध्याय) ०३/०८/२८**
**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**
**हा भवसागर तरण्याचा एकमात्र आधार सन्त आहेत. मनमानी साधना केल्याने सर्व जीवन व्यर्थ नष्ट होऊन जाते; लक्ष्यप्राप्ती होत नाही. सद्गुरु प्रकाशात त्यांच्या नियम आदेशानुकूल साधना केल्यावर उद्देशाची प्राप्ती होते.**

.......................................................................................

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.**

## समर्थ रामदास

आधुनिक केसरी



ज्ञानदेवांनी ताटीचे दार उघडले आणि त्यानंतर आयुष्यात त्यांच्या हातून अलौकिक कार्य घडले. ज्ञानदेवांच्या अलौकिक कार्याला श्री निवृत्तीनाथांची कृपा आणि मुक्ताबाईंची धेयस्वप्नांची जाणीव होती. समाजाभिमुख आणि अत्यंत अर्थपूर्ण अशी मुक्ताबाईच्या अभंग रचना आहेत. मुक्ताबाईंनी ताटीचे अभंग लिहिले त्याचप्रमाणे हरिपाठाचे सुद्धा अभंग लिहिलेत.

**"अखंड जायला देवाचा शेजार कारे अहंकार नाही गेला | मान अपमान वाढविसी हेवा दिवस असता दिवा हाती घेसी ||"**

मुक्ताबाईंचे विचार फार साधे मात्र परखड होते. मराठीतील पहिल्या कवयित्री म्हणून आज देखील त्यांचा नामोल्लेख होतो. मुक्ताबाईंनी 'ज्ञानबोध' या ग्रंथाचेही लेखन केले आहे. ह्या ग्रंथामध्ये संत निवृतिनाथ आणि संत मुक्ताबाई ह्यांचा संवाद आलेला आहे.


संत ज्ञानदेवांनी समाधी घेतल्यानंतर ज्येष्ठ बंधू निवृतिनाथ मुक्ताबाईंना घेऊन तीर्थयात्रा करण्याकरता निघाले. ते तापी नदीवर आले असता अचानक वीज कडाडली. संत मुक्ताबाई प्रचंड विजेच्या प्रवाहात लुप्त झाल्या (१२ मे १२९७). मुक्ताबाईंची समाधी जळगाव जिल्ह्यातील कोथळी येते आहे. समर्थ रामदास, जन्म नाव - नारायण सूर्याजी ठोसर (२४ मार्च १६०८, जांब - १३ जानेवारी, १६८१, सज्जनगड) हे महाराष्ट्रातील कवी व समर्थ संप्रदायाचे संस्थापक होते.[१] रामाला व हनुमंताला उपास्य मानणाऱ्या समर्थ रामदासांनी परमार्थ, स्वधर्मनिष्ठा, राष्ट्रप्रेम यांच्या प्रसारार्थ महाराष्ट्रात प्रबोधन व संघटन केले.[२] ते संत तुकारामांचे समकालीन होते. राजकारण धर्मकारणात जाणीवपूर्वक अंतर्भूत करणारे रामदास हे एकमेव महाराष्ट्रीय संत होते.[३] पर्यावरणावर प्रबोधन आणि लिखाणही त्यांनी केले आहे. समर्थ रामदास स्वामींच्या वडिलांचे नाव सूर्याजीपंत ठोसर असे होते. ते देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण असून जमदग्नी हे त्यांचे गोत्र होते. ते सूर्योपासक होते. त्यांच्या पत्नीचे, म्हणजे गंगाधर-नारायणांच्या आईचे नाव 'राणूबाई' होते. समर्थ रामदासस्वामी (नारायण) यांचा जन्म श्रीक्षेत्र जांबसमर्थ या गावी (जालना जिल्हा) शके १५३० (सन १६०८) मध्ये रामनवमीच्या दिवशी म्हणजे चैत्र शुद्ध नवमीस, रामजन्माच्याच शुभमुहूर्तावर, म्हणजे माध्यान्ही झाला. ठोसरांचे घराणेच सूर्योपासक होते. नारायण सात वर्षाचा असतांनाच वडील सूर्याजीपंतांचे निधन झाले. घरची सांपत्तिक स्थिती चांगली होती, पण नारायण लहानपणापासूनच विरक्त होता. अतिशय बुद्धिमान, निश्चयी तसेच खोडकर होता.

## कोणत्याही परिस्थितीत वृत्ती स्थिर ठेवावी

आधुनिक केसरी

अमानित्व हा देहाचा धर्म आहे. दुसऱ्याचा मोठेपणा राखून आपला मोठेपणा वाढवावा. दंभ हा मनाचा धर्म आहे. तो दुसऱ्याला फसविण्याकरिता नसावा. स्वतःचे कल्याण करून घेण्यापुरताच दंभ असल्यास हरकत नाही. अहिंसा हा देहाचा धर्म आहे. अहिंसा ही हेतूवर अवलंबून असते. वाचेने कोणाचे मन दुखवू नये, आणि देहाने परपीडा करू नये. दुसऱ्याचे दोष सांगणे हे हीनपणाचे लक्षण आहे. लौकिकातला मोठेपणा एका जन्माचा घात करतो, पण दंभ आणि हिंसा अनेक जन्माचा घात करतात. द्वेषामुळे हिंसा घडते, म्हणून आपण कोणाचाही द्वेष करू नये. कामक्रोधादि सर्वच विकार भगवंताच्या आड येतात, पण वैर आणि द्वेष यांसारखा नाश करणारा शत्रू नाही. स्वार्थामुळे द्वेष घडतो. स्वार्थ जायला नामासारखे दुसरे साधन नाही.

आपली वाचा दुसऱ्याला शिकविण्यासाठी आणि मोठेपणासाठी नाही. वाचेने म्हणजे जिभेने बोलता येते आणि खाता येते. नेहमी सत्य आणि गोड बोलावे, आणि खाण्याच्या बाबतीत जीभ आपल्या ताब्यात ठेवावी.



स्वतःची चित्तशुद्धी करून घेऊन, संतांचे गुण आपल्या आचरणात आणण्याचा प्रयत्न करावा. अभिमानाचे विष जिथे येते, तिथे नामाची आठवण ठेवावी. हिरण्यकश्यपूच्या ठिकाणी देखील भगवंत नव्हता असे नाही; पण कुंपण फार वाढल्याने शेत दिसेनासे व्हावे, तसे हिरण्यकश्यपूचे झाले. स्वतःच्या ठिकाणी भगवंत आहे हे हिरण्यकश्यपू अभिमानाने विसरला. त्यामुळे भगवंताला खांबात दिसावे लागले. अभिमान जरूरीपुरताच ठेवावा. 'मी रामाचा आहे' असा अभिमान धरावा. नामाची कास धरावी. 'नारायणाचे दर्शन व्हावे' असे नाही प्रल्हाद म्हणाला, 'नाम सोडणार नाही' असे म्हणाला. लहानपणाची वृत्ती चांगली असते. लहानपणात चूक नाहीच, आणि सगळा फायदाच असतो. भगवंताजवळ आपण लहान मूल झाल्याशिवाय त्याला कृपेचा पान्हा फुटायचा नाही; म्हणून आपण भगवंतापाशी लहान व्हावे. लहानपण हे वयावर अवलंबून नसून आपल्या वृत्तीवर अवलंबून असते. कोणाविषयीही वाईट विचार मनात आणू नयेत; त्यापासून आपलेच मन गढूळ होते. 'माझा प्रपंच जसा व्हायचा असेल तसा होवो, पण तुझा विसर मला पडू देऊ नकोस,' असे परमेश्वराला अनन्यतेने म्हणावे. मला खात्री आहे, तो तुमच्या साहाय्याला आल्यावाचून राहणार नाही.

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
मंगळवार, ७ नोव्हेंबर २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari



# धाराशिवमध्ये बोगस डॉक्टर शोधन जिल्हास्तरीय समितीची बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**धाराशिव :** आरोग्य विभागांतर्गत बोगस डॉक्टर शोधन जिल्हास्तरीय समितीची बैठक 6 नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल गुप्ता यांच्या प्रमुख उपस्थितीत घेण्यात आली. या बैठकीमध्ये जिल्ह्यातील अनाधिकृत वैद्यकीय व्यवसायिकांचा तालुकानिहाय गोषवारा सादर करण्यात आला. जिल्ह्यात आतापर्यंतच्या सर्वेक्षणामध्ये 90 व्यवसायीकांची नोंद झाली आहे. त्यापैकी तालुकाअंतर्गत विविध पोलिस स्टेशनमध्ये 26 व्यवसायीकांवर अनाधिकृत वैद्यकीय पोलिस तपास सुरु आहे.15 प्रकरणे न्यायालयात प्रलंबित आहेत.तसेच 42 व्यावसायिकांना यादीतून काढून टाकण्यात आले.यामध्ये व्यवसाय बंद केलेले, फरार, मयत आदींचा समावेश आहे.

तालुकास्तरीय ग्रामीण व शहरी पथकांनी प्राप्त तक्रारी व माहितीनुसार गुन्हे दाखल न झालेल्या उर्वरित सर्व व्यवसायीकांवर गुन्हे दाखल करावेत व व्यवसाय बंद केलेले व्यवसायीकांनी पुन्हा व्यवसाय चालू केले किंवा नाही याबाबत दक्षता घेण्यात यावी.जर त्यांनी नंतर व्यवसाय चालू केला असेल तर त्यांच्यावर पुन्हा कारवाई करण्यात यावी.असे जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल गुप्ता यांनी सांगितले.

जिल्ह्यात अनेक बोगस वैद्यकीय व्यवसायिक व्यवसाय करीत आहे,अशा अनेक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, अशा अनाधिकृत वैद्यकीय व्यवसायीकांवर प्रतिबंधात्मक कायदेशीर कार्यवाही करण्यासाठी पुढीलप्रमाणे तालुकास्तरीय पथके गठित करण्यात आले आहे. ग्रामीण स्तरावर तालुका आरोग्य अधिकारी ( संबंधित तालुका), गटविकास अधिकारी प्रतिनीधी (संबंधित तालुका), सहाय्यक पोलिस निरिक्षक/पोलिस उपनिरिक्षक (स्थानिक पोलिस स्टेशन संबंधित तालुका कार्यक्षेत्र).

शहरी भागात अतिरिक्त शल्यचिकित्सक हे धाराशिव शहराकरीता इतर सर्व तालुक्यासाठी वैद्यकीय अधीक्षक (संबंधित तालुका), मुख्याधिकारी नगर परिषद ( संबंधित तालुका),सहाय्यक पोलिस निरिक्षक / पोलिस उपनिरिक्षक (स्थानिक पोलिस स्टेशन संबंधित तालुका कार्यक्षेत्र).

तालुका स्तरीय गठीत पथकास सन 2022-23 या वर्षात अनाधिकृत वैद्यकीय व्यवसायीकांवर कारवाईसाठी मान्यता देण्यात आली. तालुकास्तरावर पथकाने कार्यवाही करताना संबंधित व्यवसायीकाची माहिती घेण्यात यावी.या बैठकीस जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतिश हरिदास यांनी उपस्थितांचे स्वागत करुन बैठकीस सुरुवात केली. बैठकीत जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी प्रस्तावना केली. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सतिश हरिदास, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. इस्माईल मुल्ला, जिल्हा प्रजनन व बाल आरोग्य अधिकारी डॉ. कुलदीप मिटकरी, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी तथा सह संचालक कुष्ठरोग डॉ.मारुती कोरे,निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. फुलारी, जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी रेणुका राठोड आणि सर्व वैद्यकीय अधीक्षक व सर्व तालुका आरोग्य अधिकारी तालुका सर्व जिल्हास्तरीय सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# तेलंगणातील BRS ची महाराष्ट्रात एण्ट्री, १० ग्रामपंचायतीवर फडकावला झेंडा

आधुनिक केसरी न्यूज

**भंडारा :** तेलंगणाच्या भारत राष्ट्र समिती (बीआरएस) पक्षाने ग्रामपंचायत निवडणुकीच्या माध्यमातून महाराष्ट्रात पाय रोवण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. राज्यातील तब्बल 2 हजार 359 ग्रामपंचायतीचा निकाल समोर येत आहे. भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी यांच्यासह आता बीआरएस पक्षालाही ग्रामपंचायत निवडणुकीत यश मिळाले आहे. तेलंगणाचे मुख्यमंत्री के चंद्रशेखर राव यांच्या बीआरएस पक्षाला महाराष्ट्रातील दहा ग्रामपंचायतीमध्ये विजय मिळला आहे. भंडाऱ्यातील नऊ ग्रामपंचायतीवर बीआरएस पक्षाने झेंडा रोवला आहे. तर बीडमधील रेवती देवकी ग्रामपंचायतही ताब्यात आली आहे. भंडारा जिल्ह्यातील ६६ पैकी २० ग्रामपंचायतीचा निकाल समोर आला आहे. भंडाऱ्यात आतापर्यंत बीआरएस पक्षाने बाजी मारली आहे. भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादीला पक्षाडत बीआरएस पक्षानं आतापर्यंत भंडाऱ्यातील 9 ग्रामपंचायतीवर झेंडा फडकावला आहे. भाजप आणि काँग्रेस पक्षाला आतापर्यंत दोन दोन ग्रामपंचयतीमध्ये विजय मिळवता आलाय. तर शरद पवारांच्या राष्ट्रवादीला एका ग्रामपंचायतीमध्ये विजय



मिळला. बीडमध्येही बीआरएस पक्षाने विजय मिळवला आहे. गेवराई तालुक्यातील रेवकी ग्रामपंचायतीवर बीआरएसने झंडा फडकावला आहे. शशिकला भगवान मस्के या सरपंचपदी विराजमान झाल्यात.

के चंद्रशेखर राव यांनी आपल्या बीआरएस पक्षाचा विस्तार करण्यासाठी महाराष्ट्रातून सुरुवात केली. आषाढी एकादशीला तेलंगणामधून तब्बल ३०० गाड्यांचा ताफा घेऊन के चंद्रशेखर राव यांनी महाराष्ट्रात ग्रँड एंट्री केली. चंद्रशेखर राव यांच्या बीआरएस पक्षात राज्यातील अनेक नेत्यांनी प्रवेश केला होता. चंद्रशेखर राव यांनी मागील काही दिवसात महाराष्ट्रात अनेक सभा घेत शेतकऱ्यांना अश्वासने दिली आहेत. त्याशिवाय सत्ताधारी भाजपवर त्यांनी टीकाही केली. केसीआर यांनी मराठवाड्यातील नांदेड येथून महाराष्ट्रात प्रचाराला सुरूवात केली होती, नांदेड येथे घेतलेल्या सभेत त्यांनी अबकी बार किसान की सरकार असी घोषणा दिली होती.

# राष्ट्रवादी काँग्रेस इगतपुरी तालुका अध्यक्षपदी पांडुरंग वारुंगसे

आधुनिक केसरी न्यूज

**इगतपुरी :** तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट) तालुका अध्यक्ष पदी युवा नेते तथा पंचायत समिती माजी उपसभापती पांडुरंग वारुंगसे यांची निवड झाली आहे.

या निवडीची घोषणा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी चे नाशिक जिल्हा अध्यक्ष विष्णुपंत म्हैसधुणे यांनी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार व राष्ट्रवादी काँग्रेस चे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष तथा खा. सुनील तटकरे यांचे आदेशान्वये केली आहे. पांडुरंग वारुंगसे यांनी पत्रकार म्हणुन आपल्या कारकिर्दीला सुरुवात केली होती. पत्रकारीतेतुन राजकारणात पदार्पण करतानां त्यांनी राष्ट्रवादी कांग्रेस पक्षात प्रवेश केला. या पक्षाकडुन ईगतपुरी पंचायत समितीची निवडणुक लढवुन ते सदस्य म्हणुन विजयी झाले होते. तर याच काळात ते ईगतपुरी पंचायत समिती चे उपसभापती ही होते. घोटी कृषी उत्पन्न बाजार समितीचेही ते संचालक ते उपसभापती होते. यापुर्वी बेलगाव तर्हाळे या आपल्या गावचे सरपंच पद ही त्यांनी भुषवले होते, पक्षातही त्यांनी यापुर्वी तालुका ते जिल्हा पातळीवर विविध पदावर काम केले आहे.

**पक्ष घरा-घरात पोहोचवणार :** मा.अजित पवार,मा.सुनील तटकरे आदीसह पक्षाचे वरीष्ठ नेत्याच्यां मार्गदर्शनाखाली आपण काम करु व पक्ष घरा-घरात पोहचवु. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकांसह येणार्या काळात पक्ष अग्रेसर ठेवण्यासाठी आपण काम करु.



**पांडुरंग वारुंगसे, नव निर्वाचित तालुका अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ईगतपुरी तालुका**





# अमेरिकेची घोषणा

आधुनिक केसरी

गेल्या महिन्याभरापासून चालू असलेले इस्रायल-हमास युद्ध अद्याप थांबण्याची चिन्ह दिसत नाहीयेत. जगभरातल्या देशांसह संयुक्त राष्ट्रांनीही दोन्ही बाजूची जीवित व वित्तहानी टाळण्यासाठी तातडीने युद्धबंदी करण्याची मागणी केली. मात्र, दोन्ही बाजूंनी ही मागणी धुडकावून लावली असून युद्ध दिवसेंदिवस तीव्र होत असल्याचं दिसत आहे. इस्रायलचे सैन्य पुढच्या ४८ तासांत गाझा शहरात शिरणार असल्याचे सांगितलं जात आहे. या पार्श्वभूमीवर अमेरिकेने मोठी घोषणा केली असून त्यामुळे युद्धाची सर्व समीकरणे बदलण्याची शक्यता आहे. अमेरिकेच्या सेंट्रल कमांडने आज सकाळी एक्सवर (ट्विटर) आपल्या अधिकृत हँडलवरून ही घोषणा केली आहे. ५ नोव्हेंबर, अर्थात घोषणा केल्याच्या एक दिवस आधी अमेरिकेची ओहियो श्रेणीतील पाणबुडी सेंट्रल कमांडच्या अखत्यारीत येणाऱ्या भागात दाखल झाल्याचं जाहीर करण्यात आले आहे. या पाणबुडीत अत्याधुनिक क्षेपणास्र किंवा टॉमहॉक क्रुज क्षेपणास्र वाहून नेण्याच्या क्षमता असल्यामुळे जगभरात चिंता व्यक्त केली जात आहे. एकीकडे अमेरिकेचे संरक्षण सचिव अँटनी ब्लिंकेन हे मध्यपूर्वेच्या दौऱ्यावर असताना दुसरीकडे अमेरिकेने उचललेले हे पाऊल चर्चेचा विषय ठरले आहे.इस्रायल-हमास युद्ध, इराणमुळे निर्माण झालेली परिस्थिती या पार्श्वभूमीवर अमेरिकेचे संरक्षण सचिव अँटनी ब्लिंकेन सध्या मध्यपूर्वेच्या दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यात आत्तापर्यंत त्यांनी वेस्ट बँक, टर्कीये, इराक, जॉर्डन आणि सायप्रसला भेट दिली आहे. या दौऱ्यात मध्य-पूर्वेतील तणाव कमी व्हावा यासाठी ब्लिंकेन प्रयत्न करत असल्याचे अमेरिकेकडून सांगण्यात आले आहे. ओहियो श्रोणीतील पाणबुड्या या अत्याधुनिक क्षेपणास्रे वाहून नेऊ शकतात. पण त्यांची अण्वस्र वाहून नेण्याची क्षमता त्यांना खऱ्या अर्थाने शक्तीशाली बनवते. या श्रेणीतली एक पाणबुडी तब्बल २४ ट्रायडेंट टू डी ५ अण्वस्रे वाहून नेऊ शकते. समुद्र पृष्ठभागाच्या खाली बेमालूमपणे कारवाया करण्यासाठी या पाणबुड्या ओळखल्या जातात. अमेरिकेकडून अशा प्रकारे आपल्या पाणबुड्या अमुक प्रदेशात उतरल्याचे कधीही जाहीर केले जात नाही. उलट अमेरिकेच्या अण्वस्त्रवाहू पाणबुड्या अत्यंत गोपनीय पद्धतीने हालचाली करत असतात. अमेरिकेच्या या हालचालीमागे नेमका उद्देश काय असावा? यासंदर्भात तर्क-वितर्क लावले जात आहेत. गाझामधील हल्ला इस्रायलने थांबवला नाही, तर हे युद्ध इतर देशांमध्येही पसरण्याचा इशारा इराणने दिला आहे. इराणला स्पष्ट संदेश देण्यासाठी अमेरिकेने हे पाऊल उचलल्याचे सांगितले जात आहे.

# विद्यार्थी कसा असावा ?



भिमराव परघरमोल
मो.नं. 9604056104

आधुनिक केसरी

**जगभरात अनेक महापुरुषांचे जन्म-मृत्यू दिवस हे सन्माननीय नावाने तथा उत्सव रूपाने साजरे केले जातात. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवन तथा व्यक्तिमत्वपैलूंच्या स्मृती प्रित्यर्थ विविध दिनोत्सव जगभर साजरे केले जातात. जसे त्यांची जयंती ज्ञानदीन, वकिली व्यवसाय सुरू केला तो दिवस, (लॉयर डे) वकील दिन, संविधान स्वीकृतीचा संविधान दिन. तसेच त्यांनी ७ नोव्हेंबर १९०० रोजी साताऱ्याच्या प्रतापसिंग हायस्कूलमध्ये प्रथम प्रवेश घेतला तो दिवस सगळीकडे विद्यार्थी दिन म्हणून साजरा केला जातो. जगामाजी या विविध दिवसांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. कारण त्या दिवशी लोक त्या-त्या महापुरुषांना आठवण करून त्यांच्या ठायी नतमस्तक होतात.**

त्यांचा त्याग, कष्ट, समर्पणाप्रती कृतज्ञता व्यक्त करून प्रेरणा घेतात. काही लोक तर त्या दिवशी अंतर्मुख होऊन आपल्यातील गुण-दोषांची पडताळणी करून गुणांच्या भरभराटीस्तव आणि अवगुणांना निरस्तीकरणाच्या दिशेने संकल्पही करतात. महापुरुषांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करताना वरील बाबींची आवश्यकता तर आहेच. परंतु त्यांचे अपूर्ण राहिलेले कार्य कोणते? ते पूर्ण करण्याच्या दिशेने कूच करून, त्यांना सहकार्य करणारांप्रति सहानुभूती, तर विरोधकांच्या पिलावळीपासून सावधानताही क्रमप्राप्त ठरते.

त्याच दृष्टीकोनातुन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विद्यार्थी दिवस हा अतिशय महत्त्वाचा ठरतो. कारण तो दिवस विद्यार्थ्यांना प्रेरणादायी असतो. विद्यार्थी हे देशाचे भावी नागरिक असल्यामुळे ते राष्ट्राचा आधारस्तंभ असतात. त्यांच्या भवितव्यावर समर्थ राष्ट्राचा डोलारा उभा राहणार असतो. म्हणून त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांप्रमाणे सर्वगुणसंपन्न असावे. त्यांच्यामध्ये राष्ट्रभक्ती ओतप्रोत भरलेली असावी. दहा नैतिक मूल्यांसह चार महान मानवी मूल्यांनी त्यांचे व्यक्तिमत्व उभरलेले असावे. शेतीप्रधान देशामध्ये कष्टाला महत्त्व देणारे ते असावे. त्यासाठी श्रमप्रतिष्ठा, वैज्ञानिक दृष्टिकोन, स्त्री-पुरुष समानता ही मूल्य त्यांच्या ठाई ठाई दिसावे. असे झाले नाही तर तरुणाई बेलगाम बेफाम होऊन राष्ट्र अधोगतीला गेल्याशिवाय राहणार नाही. आणि अधोगतीला गेलेले राष्ट्र कुणाचे तरी गुलाम होऊन आपले स्वातंत्र्य अबाधित राखण्यास असमर्थ ठरते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वतःला आजन्म विद्यार्थी समजत होते. एखाद्याने



आयुष्यभर जरी विद्येची उपासना केली, तरी तो मनुष्य ज्ञानसागराच्या गुडघाभर पाण्यातच उतरू शकतो. एवढी ज्ञानाची अथांगता आहे. म्हणून प्रत्येक मनुष्य हा आजन्म विद्यार्थीच असला पाहिजे. विद्येची, ज्ञानाची उपासना करताना १२ डिसेंबर १९३८ ला मुंबई येथे अस्पृश्य विद्यार्थी संमेलनामध्ये विद्यार्थ्यांसमोर अतिशय वस्तुनिष्ठ आणि समाज प्रचलित उदाहरण देताना ते म्हणतात की, "दारूचे व्यसन लागल्यानंतर जसं ते मरेपर्यंत सोडून जात नाही, तसं ज्ञानोपासणेच व्यसन जडलं पाहिजे. परगावातील एखाद्या प्रेयसीला भेटायला जाताना एखादा मनुष्य वेळ-काळाचे भान न ठेवता रस्त्यात येणाऱ्या संकटांना मात देतो. कोणतीही आडवाट त्याला थांबवू शकत नाही. जंगली श्वापदांची हिंस्र पशूंची त्याला भीती वाटत नाही, त्याप्रमाणे विद्येवर प्रेम केलं पाहिजे. जेणेकरून तीही तुमच्या प्रेमात पडेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या जीवनात तीन महापुरुषांना गुरुस्थान देऊन तीन दैवतांची उपासना केली. ज्यामुळे त्यांना एका युरोपियन व्यक्तीने जगातील सहा विद्वानांमध्ये स्थान दिलं. त्यांचे तीन गुरु म्हणजे तथागत गौतम बुद्ध, संत कबीर आणि महात्मा ज्योतिराव फुले. हे तीनही गुरु त्यांचे समकालीन नसून त्यांच्यासोबत त्यांचा जात, धर्म, पंथ असा कुठलाही तीळमात्र, काडीचाही संबंध नव्हता. तरीही आयुष्यभर ते त्यांच्याच वाटेवरील वाटसरू म्हणून जगले. कारण तथागत गौतम बुद्धाने मानवी मूल्यांची (समता, स्वातंत्र्य, न्याय, बंधुता) प्रसव केली. तर त्या मूल्यांच्या प्रस्थापनेसाठी इतरांनी आपली हयात खर्ची घातली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची तीन उपास्य दैवतं म्हणजे विद्या, स्वाभिमान आणि शील. ज्यामुळे त्यांचा समाजात नैतिक धबधबा निर्माण झाला. विद्येच्या संदर्भात बोलताना ते म्हणतात की, "मनुष्याला अन्नाप्रमाणे शिक्षणाची ही गरज असते. ज्ञानाशिवाय काहीही होऊ शकत नाही. परंतु आमच्यासाठी धर्माने ज्ञानाचे सर्व दरवाजे बंद केलेले होते. त्यांचे विद्येचे वेड हे भयंकर होते त्यांच्या वैयक्तिक ग्रंथसंभारामध्ये अनेक दुर्मिळ हस्तलिखिते व संदर्भग्रंथांसह २० हजार पुस्तकांचा संग्रह होता. त्यांचे दुसरे दैवत म्हणजे स्वाभिमान. आपल्या समाजात तो निर्माण करण्यासाठी त्यांनी प्रथम प्राधान्य दिले. त्यांचे स्वतःचेही व्यक्तिमत्व स्वाभिमानाने ओत-प्रोत होते. त्यांच्या मते अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी विद्यार्थी हा स्वाभिमानी व स्वावलंबी असला पाहिजे. शेळी होऊन दीर्घायुषी होण्यापेक्षा वाघासारखे संघर्षरत अल्पायूषी होण्यास हरकत नाही. शिकलेला व्यक्ती जर स्वाभिमानी असेल तर तो स्वार्थापोटी कुठल्याही अमिषाला बळी न पडता आपल्या अंगीकृत कर्तव्यासाठी जागृत राहील. स्वावलंबी होण्यासाठी विद्यार्थ्यांने शिकून एखादी नोकरी मिळवणे हे वाईट नसलं, तरी त्यांच्यामध्ये काही दोष निर्माण होऊ नये. तो स्वार्थी बनू नये. आपणामध्ये जी लायकी निर्माण झाली, ती आपोआप झाली नसून त्यासाठी महापुरुषांनी खस्ता खाल्लेल्या आहेत. त्यामागे त्यांचा त्याग, कष्ट, समर्पण आहे. हे त्यांनी समजून घेतलं पाहिजे. त्या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, "शिकलेला व्यक्ती नोकरी मिळाल्यानंतर एवढा स्वार्थी बनतो, की समाजाकडे लक्ष द्यायला त्याला वेळच मिळत नाही. तो स्वार्थामध्ये एवढा गुरफटतो की स्वतःला शिक्षण प्रक्रियेमधून बाद करतो. त्याने तसं न करता क्षणाक्षणाला होणारे ज्ञान सतत वेचत राहिले पाहिजे. कोणी प्रवासात जरी असला तरी त्याच्याकडे चार-दोन पुस्तके व वर्तमानपत्र असली पाहिजे. अन्यथा कष्टाने मिळवलेले ज्ञान विकसित झालेल्या सर्व कलाकुसर, कौशल्य लोप पावण्यास वेळ लागणार नाही." पाश्चात्य विचारवंत मॅझिनी म्हणतो की, लोकात पारतंत्र्य पसरले, मानसे शिकली तरी त्यांच्यात कर्तव्यापेक्षा हक्काची जाणीव जास्त उत्पन्न होते. आपले कर्तव्य कोणते याची जाणीव होत नाही हा मोठा दोष. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे तिसरे दैवत म्हणजे शील होय. शील म्हणजे सदाचरण. कोणाशीही दगाबाजी, फसवणूक, आत्मसिद्धीसाठी पाप न करणे. शीलाच्या संदर्भात बोलताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभिमानाने सांगतात की, " शील संवर्धन हा गुण माझ्यात मोठ्या प्रमाणात आहे. मी विलायतेला असताना दारू बीडीला हातही लावला नाही. मला कसलेही वेसन नाही." शील संवर्धना संदर्भात आणखी एका ठिकाणी ते म्हणतात की," मला माझे सर्व विरोधक घाबरतात. त्याचे कारण म्हणजे की मी खूप शिकलेला आहे, मी विद्वान आहे किंवा माझ्या मागे संपूर्ण अस्पृश्य समाज आहे असे नव्हे. तर मी शीलवान आहे. मी पराकोटीची गरिबी उपभोगली, तरी कोणासमोर हात पसरला नाही. मी कोणतेही पाप केल्याचे मला आठवत नाही. आजन्म विद्यार्थी असणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून समस्त बहुजन समाजातील (एससी, एसटी, ओबीसी, व्हीजेएनटी, एसबीसी) विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची, शिष्यवृत्तीची, नोकरीची आणि नोकरीनंतर बढतीची व्यवस्था निर्माण केली. सोबतच संविधानाच्या प्रकरण चार नीतीनिर्देशक तत्वाच्या अनुच्छेद ४६ नुसार दुर्बल वंचित घटकांचे शैक्षणिक व आर्थिक हितसंवर्धन करण्यासाठी राज्यांना जे काही करण्याची इच्छा असेल ते करण्यासाठी अधिकारीत केलेले आहे. आजच्या विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू आपल्या व्यक्तिमत्त्वाचा अविभाज्य भाग बनवण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले पाहिजे. संविधानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना दिलेले कवच निकामी करून त्यांना ज्ञान आणि धनापासून वंचित ठेवून मनुस्मृतीचे राज्य आणण्यासाठी टपलेली व्यवस्था वेळीच ठेचून काढण्यासाठी सज्ज झाले पाहिजे. त्यासाठी भारतीय संविधान प्रत्येकाने समजून घेऊन त्याचा सन्मान, सुरक्षा व संवर्धन करणे अगत्याचे आहे. असे करणे म्हणजेच विद्यार्थी दिनाच्या निमित्ताने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना सच्चे अभिवादन करणे होय.

# प्रदूषणाचा भस्मासुर रोखा



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**देशाची राजधानी असलेली दिल्ली आता प्रदूषणाचीही राजधानी बनली आहे. दिल्लीतील प्रदूषणाने धोक्याची पातळी ओलांडली आहे. राजधानी दिल्लीतील हवेचा दर्जा निर्देशांक ( ए क्यू आय ) ४१५ वरून ४६० वर घसरला आहे त्यामुळे दिल्ली हे जगातील सर्वाधिक प्रदूषित शहर बनले आहे. अर्थात ही काय भूषणावह बाब नाही उलट यामुळे देशाची मान खाली झुकली आहे अर्थात त्यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही दिल्लीतील प्रदूषणावर नियंत्रण आणण्यासाठी ठोस उपाय करा असा अनेक सामाजिक व सेवाभावी संघटनेने सरकारला इशारा दिला होता मात्र सर कारने त्याकडे दुर्लक्ष केले. मार्च महिन्यातच स्विस संस्था आयक्युएअरने जागतिक प्रदूषणावर एक अहवाल प्रसिद्ध केला होत.**

हा अहवाल भारतासाठी धक्कादायक होता कारण या अहवालात भारत जगातील आठव्या क्रमांकाचा प्रदूषित देश असून दिल्ली जगातील चौथ्या क्रमांकाचे प्रदूषित शहर असल्याचे नमूद करण्यात आले होते व त्याच अहवालात प्रदूषित शहरांच्या यादीत चौथ्या क्रमांकावर असलेली दिल्ली लवकरच पहिल्या क्रमांकावर पोहचेल असा इशाराही दिला होता. अवघ्या सात महिन्यात त्यांचा इशारा खरा ठरला. स्विस संस्थेने तयार केलेल्या या अहवालाच्या निर्मितीसाठी वातावरणातील प्रदूषणकारी घटक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पीएम - २.५ कणांचे प्रमाण बारकाईने तपासण्यात आले होते. जगातील १३१ देशांमध्ये बसविण्यात आलेल्या ३० हजार ग्राउंड मॉनिटरच्या माध्यमातून ७३०० शहरांची माहिती संकलित करण्यात आली होती. या अहवालातील निष्कर्ष पाहिल्यानंतर भारतातील प्रदूषणाची समस्या किती गंभीर आहे हे लक्षात येईल. विशेष म्हणजे जगातील सर्वाधिक प्रदूषित शहरांच्या यादीत भारतातील दिल्ली, मुंबई, कोलकाता, हैदराबाद, चेन्नई यासारख्या मोठ्या आणि महत्वाच्या शहरांचा समावेश आहे. या शहरात वातावरणातील प्रदूषणकारी घटक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पीएम - २.५ कणांचे प्रमाण ५३.३ मायक्रोग्राम क्यूबिक मीटर या पातळीवर आले असून ते आरोग्य संघटनेने निर्धारित केलेल्या सुरक्षेच्या पातळीपेक्षा दहापटीने अधिक असल्याचे दिसून आले आहे. आज देशातील सर्वच महत्वाची शहरे प्रदूषणाने गुदमरत आहेत. त्या शहरात राहणाऱ्या नागरिकांचे जीवन प्रदूषणामुळे धोक्यात आले आहे. एकीकडे २१ व्या शतकातील सुखासीन जीवनाचे मनोहरी चित्र उभे केले जात आहे. स्मार्ट सिटीचे स्वप्न दाखवले जात आहे तर दुसरीकडे याच शहरांची फुफ्फुसे प्रदूषणाने निकामी होत आहेत. प्रदूषणामुळे या शहरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. प्रदूषणामुळे या शहरातील नागरिकांना फुफ्फुसाचे, हृदयाचे, रक्ताभिसरणाचे आजार मोठ्या प्रमाणावर होत आहेत. न्यूमोनिया, पक्षघात, हृदयविकार, फुफ्फुसाचा कर्करोग यासारखे मोठे आजार प्रदूषित हवेमुळेच होत आहेत. प्रदूषणामुळे दिल्लीसारख्या देशाच्या राजधानीची किती वाईट अवस्था झाली आहे हे आपण पाहत आहोतच. प्रदूषणामुळे दिल्लीतील शाळा कॉलेजसना सुट्टी देण्याची वेळ प्रशासनावर आली आली आहे. तीन वर्षांपूर्वी दिल्लीत इंग्लंड आणि भारत यांच्यात झालेल्या कसोटी सामन्यात खेळाडू चक्क मास्क लावून मैदानात उतरले होते. नंतर हा सामना देखील प्रदूषणामुळे रद्द करावा होता त्यामुळे भारताची जगात नाचक्की झाली होती. जे दिल्लीत आहे तेच मुंबईत आहे. देशाची आर्थिक राजधानी असलेली मुंबई प्रदूषणाच्या बाबतीत देशाच्या राजधानीची बरोबरी करू लागली आहे. मुंबईचे प्रदूषणही उच्चतम पातळीवर पोहचले आहे. प्रदूषणामुळे लोकांना शुद्ध हवा मिळणे दुरापास्त झाले आहे. शुद्ध हवेसाठी लोकांना पैसे मोजावे लागत आहे. मुंबई - दिल्लीसारख्या मोठ्या लोकसंख्येच्या शहरात ऑक्सिजन बार सुरू करण्यात आले आहेत. एका तासाला २०० ते ५०० रुपये मोजून नागरिक ऑक्सिजन विकत घेत आहेत. इतके होऊनही आपण त्यातून बोध घेत नाही.

या मोठ्या शहरात वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. मुंबई, पुणे, नागपूर यासारख्या मोठ्या शहरात लोकसंख्येपेक्षा वाहनांची संख्या अधिक आहे. वाढत्या वाहनांमुळे प्रदूषणात भर पडत आहे. वाहनातून बाहेर पडणाऱ्या धुरात प्रदूषणाचे प्रमाण खूप असते. धूळ, कारखान्यातून निघणारा धूर, बांधकामातून पसरणारे कण, वृक्षतोड, पृथ्वीचे वाढते तापमान, प्लास्टिकचा भस्मासुर अशा अनेक कारणांमुळे प्रदूषणाचा आलेख उंचावत आहे. स्विस संस्थेने जाहीर केलेला अहवाल म्हणजे धोक्याची घंटा आहे. वाढते प्रदूषण कमी करण्यासाठी वेळीच ठोस उपाय करायला हवेत. कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या धुरातून प्रदूषणकारी घटक कमी करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करायला हवा. दगड खाणींवर नियंत्रण आणायला हवे. वाहनांची संख्याही कमी करायला हवी. प्रसंगी सम - विषम सारखे कठोर निर्णय घ्यायला हवेत. युरोपीय देशात प्रदूषण कमी करण्यासाठी काय उपाययोजना केल्या जातात याचा अभ्यास करायला हवा. नागरिकांनी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा अधिकाधिक वापर केला पाहिजे. याशिवाय कचऱ्याचे योग्य वर्गीकरण आणि विल्हेवाट तसेच सौरऊर्जेच्या वापरावर भर द्यायला हवा. वृक्षारोपण करुन ते वृक्ष जगवले पाहिजेत. शासन, प्रशासन आणि नागरिकांच्या एकत्रित प्रयत्नांतूनच प्रदूषणाचा हा भस्मासुर रोखता येईल.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# संतप्त शेतकऱ्यांचा वीज वितरण कार्यालयासमोर ठिय्या

## अमित पाटील खडसे यांच्या मध्यास्थीने आंदोलन स्थगित





आधुनिक केसरी न्यूज

**रिसोड :** रब्बी हंगामात सतत वीज पुरवठा खंडीत करणाऱ्या रिसोड येथील वीज वितरण कार्यालयाला चार वेळा निवेदन देऊनही वीज पुरवठा सुरळीत न झाल्यामुळे अखेर संतप्त शेतकऱ्यांनी वीज वितरण कार्यालयाल समोर ठिय्या आंदोलननाचा पवित्रा घेतला होता. मात्र, भर जहाँगीर सर्कलचे जिल्हा परिषद सदस्य अमित पाटील खडसे यांनी वीज वितरणचे अधिकारी आणि कर्मचारी यांच्या सोबत चर्चा करून त्रस्त शेतकऱ्यांची समस्या वीज वितरण कंपनीच्या निदर्शनात आणून दिली असता, रिसोड येथील वीज वितरणचे कनिष्ठ अभियंता हरिष गिऱ्हे यांनी उद्या दि.७ नोव्हेंबर मंगळवार पासून शेलुखडसे येथील वीज पुरवठा सुरळीत करण्याचे आश्वासन दिले. परिणामी अमित पाटील खडसे यांच्या मध्यस्तीने संतप्त शेतकऱ्यांचा रोष निवळल्याने अखेर ठिय्या आंदोलन स्थगित करण्यात आले आहे.

सद्यस्थितीत रब्बी हंगामातील पिकांना सिंचनाची आवश्यकता असल्याने त्यासाठी वीज पुरवठा सुरळीत असण्याची अत्यंत गरज असते. मात्र वीज वितरणकडून सकाळी पाच तास आणि संध्याकाळी चार तास भारनियमन करण्यात येत आहे. तथापि रात्री नऊ वाजता वीज पुरवठा सुरू झाल्यानंतर लगेचच १५ मिनिटांच्या अंतराने हरण गॅप टाकून रात्रभर वीज पुरवठा विस्कळीत करुन ठेवल्या जातो. वीज वितरणचा महाप्रताप एवढ्यावरच थांबत नाही; तर नियोजीत वीज पुरवठ्याच्या वेळेत सुद्धा वीज पुरवठा खंडीत होत असतो. परिणामी त्रस्त झालेल्या संतप्त शेतकऱ्यांच्या सहनशीलतेचा बांध फुटला. अखेर त्रस्त शेतकऱ्यांनी आपला मोर्चा रिसोड येथील वीज वितरण कार्यालयाकडे वळविला होता. मात्रा तिथे एकही जबाबदार अधिकारी उपस्थित नसल्याने त्रस्त शेतकऱ्यांनी वितरणच्या कार्यालया समोरच ठीय्या दिला होता. सदर परिस्थिती जिल्हा परिषद सदस्य अमित पाटील खडसे यांच्या कानावर पडताच त्यांनी तातडीने युद्ध पातळीवर जावून संतप्त शेतकऱ्यांना समजावून त्यांचा रोष कमी केला. तद्वतच, वीज वितरण अधिकाऱ्यांना कार्यालयात बोलावून शेतकऱ्यांच्या समस्या बाबत सविस्तर चर्चा केली.दरम्यान वीज वितरणचे कनिष्ठ अभियंता हरिष गिऱ्हे यांनी उद्या पासून वीज पुरवठा सुरळीत करण्याचे आश्वासन दिले. त्यामूळे संतप्त शेतकऱ्यांनी ठिय्या आंदोलन मागे घेतले.

# हरवलेली महिला वर्षभरानंतर सुखरुप घरी

आधुनिक केसरी न्यूज

**अकोला :** सुमारे वर्षभरापूर्वी झारखंडमधून हरवलेल्या महिलेला तिच्या स्वतःच्या जिल्ह्यात पाठवून कुटुंबापर्यंत पोहोचविण्यापर्यंत महिला राज्यगृह व स्वयंसेवी संस्थांना यश आले आहे. निराधार, निराश्रित, हरवलेल्या व पीडित महिलांसाठी शासकीय महिला राज्यगृह ही संस्था काम करते. वाशिम जिल्ह्यातील कारंजा येथे एक महिला भटकत असताना पोलिसांना एका वर्षापूर्वी आढळून आली. या महिलेला खडकी येथील शासकीय महिला राज्यगृहात दाखल केले. ही साधारणतः ४५ वर्षांची महिला अतिशय कमी बोलणारी, तसेच तिची वर्तणूक काहीशी मतिमंदासारखी व परराज्यातील असल्याने भाषेची अडचण होती. त्यामुळे तिचे मूळ घर शोधून काढणे हे आव्हानच होते. संस्थेचे प्र. अधिक्षक गिरीश पुसदकर हे समुपदेशनाच्या विविध पद्धतींचा अवलंब करत तिच्याकडून शक्य तेवढी माहिती घेतली. अधीक्षकांनी स्वतःच्या कुटुंबाचे छायाचित्र दाखवून तिला तिच्या कुटुंबाबाबत हावभावाद्वारे विचारणा केली. त्याला प्रतिसाद मिळून तिचे नाव व गावाची माहिती प्राप्त झाली. गावाची माहिती मिळाल्यानंतर गुगलवर सर्च करून त्या गावातील शाळा, मंदिरे आदींची माहिती करून घेण्यात आली.

त्या स्थळांची ओळख महिलेने दर्शवल्यानंतर सराईकेला जिल्ह्यातील ते गाव असल्याचे निश्चित झाले. त्यानंतर तेथील पोलिसांच्या माध्यमातून चौकशी करण्यात आली व महिलेच्या भावाशी संपर्क झाला. आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्याने महिलेला घेण्यासाठी येण्यास भावाने असमर्थता दर्शवली. त्यामुळे तेथील पोलीसांशी पत्रव्यवहार करण्यात आला. तथापि, परराज्यातील महिला असल्याने विशेष परवानगीची गरज होती. या प्रक्रियेत कालावधी लागणार होता. त्यामुळे सेराईकेला येथील जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाशी ई-मेलद्वारे संपर्क साधण्यात आला. त्यांचा प्रतिसाद मिळाल्यावर महिलेला स्वतःच्या जिल्ह्यात स्थलांतरित करण्याचे निश्चित झाले. त्यासाठी चाईल्डलाईन यंत्रणा व जिल्हा बाल संरक्षण कक्षाची मदत घेण्यात आली. 'चाईल्डलाईन'च्या समन्वयक हर्षाली गजभिये यांनी वैद्यकीय तपासणी करून घेणे, यंत्रणांशी समन्वय साधणे आदी जबाबदारी स्वीकारली.




















# जिंदगी तो बेवफा है एक दिन ठुकराएगी...

आधुनिक केसरी

**हिंदी चित्रपटांमधे काही काही वेळा एखादे गीत एखादा पार्श्वगायक किंवा पार्श्वगायिकेच्या आवाजात आनंदी आणि उत्साहपूर्ण वातावरणात चित्रित झालेले असते तर कथेनुसार तेच गीत दुःखी वातावरणातही चित्रित करण्यात आलेले असते. लता मंगेशकर, मोहम्मद रफी, किशोर कुमार, आशा भोसले, मुकेश, तलत मेहमूद आदी पार्श्वगायकांनी अशी गीते गायिलेली आहेत. त्यातही पुन्हा दोन्ही प्रकारची गीते एकच पार्श्वगायक किंवा पार्श्वगायिकेने गायिली आहेत अथवा आनंदी गीत एका पार्श्वगायकाने गायिले तर दुःखी गीत अन्य पार्श्वगायकाकडून गाऊन घेण्यात आले, असेही घडले आहे.**

निर्माते-दिग्दर्शक प्रकाश मेहरा यांचा 'मुकद्दर का सिकंदर' हा चित्रपट १९७८ साली प्रदर्शित झाला. त्यात अमिताभ बच्चन नायक होते. 'जंजीर' या चित्रपटाच्या घवघवीत यशानंतर प्रकाश मेहरा आणि अमिताभ बच्चन ही हमखास यश देणारी जोडी जमली. प्रकाश मेहरा यांनी अमिताभ बच्चन यांना नायक म्हणून घेऊन नऊ चित्रपट निर्माण केले. 'मुकद्दर का सिकंदर' हा त्यातील पाचवा चित्रपट होता. त्या चित्रपटात विनोद खन्ना, राखी, अमजद खान, डॉ. श्रीराम लागू, निरुपा रॉय, कादर खान आदी नामवंत कलावंत होते. गीतकार अंजान (लालजी पांडेय) यांनी गीते लिहिली होती तर संगीत दिग्दर्शकद्वय कल्याणजी-आनंदजी यांनी संगीत दिले होते. या चित्रपटासाठी किशोर कुमार, लता मंगेशकर, आशा भोसले आणि महेंद्र कपूर यांनी गायिलेली गीते ध्वनिमुद्रित झाली होती. त्यांचे चित्रीकरणही पार पडले होते. चित्रपटातील कळसाध्याय (क्लायमॅक्स) चित्रित करण्यासाठी चार ओळींचा एक तुकडा ध्वनिमुद्रित करावयाची आवश्यकता होती आणि तो कोणाकडून गाऊन घ्यावयाचा यावर विचारविनिमय सुरू होता. कळसाध्याय काय होता हे सांगण्यापूर्वी हे सांगणे गरजेचे आहे, की चित्रपटाचा नायक सिकंदर (अमिताभ बच्चन) याच्यावर "रोते हुए आते हैं सब, हंसता हुआ जो जाएगा" हे गीत चित्रित झाले होते. तो आनंदी व उत्साही मनःस्थितीत




दुचाकीवरून फिरत हे गीत गातो. हे गीत पार्श्वगायक किशोर कुमार यांनी अशा रीतीने गायिले होते की ते अमिताभ बच्चन यांनी गायिले असावे, असेच वाटते. त्यानंतर चित्रपटाची कथा बरीच पुढे सरकते आणि अखेर शेवट येऊन ठेपतो. तो प्रसंग (सीन) असा होता, की सिकंदरला गोळी लागून तो जबर जखमी होतो. इतका की तो निपचित पडून जीवनाच्या अखेरच्या घटका मोजत असतो. त्याचा जिवाभावाचा मित्र विशाल आनंद (विनोद खन्ना) धावून येतो आणि आपल्या प्रिय मित्राचे डोके आपल्या मांडीवर घेतो. आपण आता जगत नाही हे सिकंदरला कळून चुकलेले असते. तेव्हा तो विशालला आपण म्हटलेले गीत पुन्हा गाण्याची विनंती करतो. या ठिकाणी त्या अत्यंत गंभीर आणि भावनांचा कल्लोळ दाखविणा-या प्रसंगाला चपखल बसतील अशा "जिंदगी तो बेवफा है एक दिन ठुकराएगी, मौत मेहबूबा है अपने साथ लेकर जाएगी, मर के जीने की अदा जो दुनिया को सिखलाएगा, वो मुकद्दर का सिकंदर जान-ए-मन कहलाएगा" या दुःख व्यक्त करणा-या केवळ चारच ओळी विशालच्या तोंडी टाकावयाच्या होत्या. त्या कोणाकडून गाऊन घ्यावयाच्या यावर आता विचार सुरू झाला. संगीतकार आनंदजी म्हणाले की, प्रसंगाचे गांभीर्य, दुःखात बुडालेला विशाल आणि त्याचे विदीर्ण झालेले हृदय यामुळे त्याच्या तोंडून बाहेर पडणा-या चार ओळी लक्षात घेता त्या केवळ मोहम्मद रफी यांच्याकडून गाऊन घेणेच श्रेयस्कर ठरेल आणि सगळ्यांना ते पटले. आनंदजी यांनी अधिक वेळ न दवडता मोहम्मद रफी यांच्याशी संपर्क साधला आणि त्यांना लवकरात लवकर ध्वनिमुद्रणाच्या स्टुडिओत येण्याची विनंती केली. मोहम्मद रफी त्यावेळी दुसऱ्या स्टुडिओत एका अन्य चित्रपटाच्या गीताच्या ध्वनिमुद्रणात व्यग्र होते; पण कसलीही सबब न सांगता ते येऊन आनंदजींना भेटले. आनंदजींनी रफी यांना प्रसंग (सीन) व्यवस्थित समजावून सांगितला आणि म्हणाले, की हे गीत किशोर कुमार यांनी गायिले आहे आणि ते अमिताभ बच्चन यांच्यावर चित्रितही झाले आहे. आपणांस त्यातील चार ओळी गावयाच्या आहेत. आनंदजी यांचे म्हणणे ऐकून रफी त्यांना म्हणाले, की किशोर कुमार यांनी हे गीत इतके छान गायिलेले असताना मी चार ओळी गायिल्या तर ते विसंगत वाटणार नाही का ? शिवाय किशोर कुमारही नाराज होतील ! यावर आनंदजी म्हणाले, की अजिबात नाही ! तो सगळा विचार आम्ही केला आहे ! या ओळी विनोद खन्ना यांच्यावर चित्रित केल्या जाणार आहेत. त्यानंतर मोहम्मद रफी त्या ओळी गावयास तयार झाले. ताबडतोब त्या चार ओळींची स्वरलिपी (नोटेशन) तयार होऊन ध्वनिमुद्रणाची तयारी झाली. आणि मोहम्मद रफी यांनी एकही रंगीत तालीम (रिहर्सल) न करता थेट ओळी गायिल्या. ओळी ध्वनिमुद्रित झाल्या. प्रकाश मेहरा यांनी त्या चित्रितही केल्या. रफी यांनी ज्या आर्ततेने त्या गायिल्या होत्या त्यामुळे चित्रपटाची अखेर अत्यंत परिणामकारक झाली. सगळ्यांनीच समाधान व्यक्त केले. या चार ओळी गाण्यासाठी मोहम्मद रफी यांनी त्यांच्या स्वभावाला अनुसरूनच मानधनाविषयी अवाक्षरही काढलेले नव्हते. पण प्रकाश मेहरा यांच्या वतीने म्हणा किंवा कल्याणजी-आनंदजी यांच्या वतीने म्हणा, या गीतासाठी किशोर कुमार यांनी जेवढे मानधन घेतले होते त्याच्या तिप्पट मानधन मोहम्मद रफी यांना देण्यात आले. मोहम्मद रफी यांनी गायिलेल्या चार ओळी जेव्हा किशोर कुमार यांनी ऐकल्या तेव्हा त्यांनी त्वरित रफी यांच्याशी संपर्क साधला आणि म्हणाले, तुम्ही ज्या पद्धतीने हे गीत गायले आहे ती अक्षरशः कमाल आहे. तुम्हाला लोक गीतांचा बादशहा म्हणतात ते उगीच नाही ! भाईजान, तुम्ही हे गीत जिवंत केले केले आहे !

अनिल रा. तोरणे
९२२६१६०६५४

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर शाळा प्रवेश दिन म्हणजेच विद्यार्थी दिवस

आधुनिक केसरी



बुद्धभूषण चं. कांबळे
संपर्क क्र. 7498715661

समता व मानवतेचे महानायक डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा 7 नोव्हेंबर हा शाळा प्रवेश दिन राज्य शासन व शिक्षण विभागाने शाळेत व महाविद्यालयात विद्यार्थी दिवस म्हणून सर्वत्र साजरा करण्याचा हा ऐतिहासिक निर्णय घेऊन एक क्रांतिकारी पाऊल उचलले आहे. 7 नोव्हेंबर 1900 रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी प्रतापसिंह हायस्कूल राजवाडा चौक सातारा येथील शाळेत प्रथम प्रवेश घेतला.त्यावेळी त्यांचे नाव भिवा होते.या शाळेच्या रजिस्टरला 1914 या क्रमांकासमोर आजही त्यांची स्वाक्षरी असून हा ऐतिहासिक दस्तावेज शाळा प्रशासनाने जपून ठेवला आहे. डॉ.बाबासाहेबांचा शाळा प्रवेश दिन म्हणजे एका अर्थाने शैक्षणिक व सामाजिक क्रांतीच होती.आणि तेव्हापासून देशात खऱ्या अर्थाने समतेचा व मानवतेचा सुर्य उगवला. हजारो वर्षापासून गुलामगिरीत खितपत पडलेल्या बहुजन समाजाला समतेचा व मानवतेचा पुरस्कार करणारा डॉ.बाबासाहेब आंबेडकर आपली ज्ञानसंपदा आत्मसात करून दिनदुबळ्यांना माणसात आणण्याचे स्वप्न पाहत होता. अठरा अठरा तास अभ्यास करून आपली ज्ञानसंपदा वाढवत होता. कारण त्यांनी देशातील विषमता समूळ नष्ट करण्याचा ध्यासच घेतला होता.त्याप्रमाणेच त्यांचा अभ्यास चालू होता. जोपर्यंत माझा समाज गुलामगिरीतून बाहेर पडून माणसात येणार नाही तो पर्यंत मी स्वस्त बसणार नाही हा विडाच त्यांनी उचलला होता.त्यांचे पहिले पाऊल शाळेत पडले व ते स्वतः प्रज्ञावंत झाले.एवढेच नाही तर करोडो दलितांचे,वंचितांचे उध्दारकर्तेही झाले.ते शाळेत गेल्यामूळेच आज ज्या संविधानाचा सर्वात आदर्श संविधान म्हणून जगभर गौरव होत आहे,त्या भारतीय संविधानाचे ते प्रमूख शिल्पकार ठरले आहेत.त्यामूळेच या देशात समता बंधूता व न्याय या तीन नीती मूल्यांची रुजवण झाली आहे व धर्मनिरपेक्ष लोकशाही व गणराज्य घडवण्याचा हा त्यांचा प्रयत्न फळास आला आहे. आणि म्हणूनच सर्वधर्मसमभाव जपणारा देश म्हणून भारताची ओळख जगासमोर निर्माण झाली आहे.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा शाळा प्रवेश दिन ही एक अत्यंत महत्त्वाची व इतिहासाला कूस बदलायला लावणारी क्रांतिकारी घटना ठरली आहे.ते आजन्म विद्यार्थी होते.आणि त्यांचा विद्याव्यासंग खूप मोठा होता. त्यांनी आपला हा विद्याव्यासंग शेवटपर्यंत जपला. म्हणून त्यांचा शाळा प्रवेश दिन विद्यार्थी दिवस म्हणून साजरा केला जातो....



# राजू शेट्टींची भूमिका महत्वाची

आधुनिक केसरी

मंगळवार 7 नोव्हेंबर रोजी दु. 2 वा. जयसिंगपूर येथील विक्रमसिंह मैदानावर स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी खासदार राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली 22 वी ऊस परिषद होणार आहे. या ऊस परिषदेकडे संपूर्ण महाराष्ट्रासह कर्नाटकाच्या सीमाभागातील ऊस उत्पादक शेतकरी आणि साखर कारखानदारांचे लक्ष लागून राहिले आहे या ऊस परिषदेत राजू शेट्टी नेमकी कोणती भूमिका जाहिर करतात ? मागील हंगामातील दुसरा हप्ता 400 मिळावा, साखर कारखान्यांचे वजन काटे डिजीटल केल्याशिवाय गाळप परवाना देवू नये तसेच यंदाच्या गळीत हंगामातील ऊसाला पहिला ॲडव्हान्स किती रुपयांचा असावा ? यासंदर्भात राजू शेट्टींची भूमिका महत्वाची ठरणार आहे. सद्या महाराष्ट्रासह कर्नाटकातील साखर सम्राटांनी अचूक वेळ साधून आपल्या साखर कारखान्यांचे बॉयलर प्रदिपन केले असून काही साखर कारखाने ऊस दर जाहीर न करताच बिनधक्कद सुरु केले आहेत त्यामुळे काही ठिकाणी संघर्षाचे वातावरण निर्माण होते आहे कर्नाटकातील संघटनेकडून यंदाच्या हंगामासाठी प्रतिटन साडेपाच हजार दराची मागणी केली आहे. तर राजू शेट्टी यांनी सांगली, कोल्हापूरसह बेळगांव जिल्ह्यातील सीमाभागामध्ये 522 कि.मि. पायी प्रवास करुन कारखानदारांना निवेदन देवून "संघर्ष ऊस दराचा आक्रोश ऊस उत्पादकांचा " या टॅग लाईनद्वारे सभा आणि ऊस परिषदेसाठी आमंत्रणही दिले आहे सद्या रासायनिक खतांचे दर आणि उत्पादन खर्च मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे. त्याच प्रमाणात एफआरपीमध्ये वाढ झालेली नाही एकरकमी एफआरपी हा शेतकऱ्यांना कायद्याने दिलेला हक्क आहे या ऊस परिषदेत फायनल भाव काय ठरणारं ? माजी.खासदार राजू शेट्टी यावेळी कोणती भूमिका घेणार ? यंदाचा हंगाम सुरळीत पार पडणार की आंदोलन होणारं ? शेट्टींच्या झंझावातापुढे साखर सम्राट नमते घेणारं



की संघर्षाला सामोरे जाणारं हे पाहणे मोठे औत्सुक्याचे ठरणारं आहे !

राजू जाधव
मांगूर जि.बेळगांव


# निविदा सूचना
# क्रं. 06 सन 2023-24

जा.क्रं. 2023/नपक/2545 दिनांक : 6/11/2023

**विशेष रस्ता अनुदान सन 2021-22 अंतर्गत नगरपरिषद कन्नड हदीतील 03 कामांसाठी योग्य त्या नोंदणीकृत गुत्तेदार / संस्थांकडून नमुना बी-1 स्वरुपाच्या ई- निविदा मागवण्यात येत आहे. सदर ई-निविदेचा तपशिल WWW. MAHATENDERS.GOV.IN या संकेतस्थळावर दिनांक 07/11/ 2023 ते 17/11/2023........ पर्यंत उपलब्ध आहे. सविस्तर अटी व शर्ती व तपशिल संकेतस्थळावर उपलब्ध आहे.**

शिक्का

मुख्याधिकारी तथा प्रशासक
नगरपरिषद कन्नड

# देश महासत्ता झाला, विश्वगुरू झाला ही भंकस, फसवी चर्चा

## लेखक डॉ. अच्युत गोडबोले : 'आंतरभारती' या दिवाळी अंकाचे प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** अर्थसत्तेच्या केंद्रीकरणाला संविधानात विरोध असून सर्वांना समान संधी देण्याचा उच्चार केला पाहिजे. स्मॉल, मायक्रो, मिनी, (एमएसएमई) हे क्षेत्र नोटा बंदीनंतर संपल्यात जमा आहेत. 1% लोकांकडे 58 टक्के संपत्ती आहे. कर्जबाजारीपणा समाजात वाढला आहे. संपत्ती आणि उत्पन्नातील विषमता या वेगवेगळया असून ही विषमता वाढत आहे. मुक्त अर्थव्यवस्थेनंतर अनेक गोष्टी बदलत चालल्या आहेत. देश महासत्ता झाला, विश्वगुरू झाला ही भंकस, फसवी चर्चा आहे, असे मत प्रसिद्ध लेखक डॉ. अच्युत गोडबोले यांनी व्यक्त केले.
ज्येष्ठ कादंबरीकार आणि मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ.लक्ष्मीकांत देशमुख यांनी संपादित केलेल्या 'आंतरभारती' या दिवाळी अंकाचे प्रकाशन संगणकतज्ज्ञ, लेखक अच्युत गोडबोले, संविधान अभ्यासक प्रा.गौतमीपुत्र कांबळे यांच्या हस्ते झाले. आंतरभारती ट्रस्ट चे अध्यक्ष पांडुरंग नाडकर्णी हे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. डॉ.लक्ष्मीकांत देशमुख, न्या.जी.डी. पारिख(निवृत्त) यांचीही विशेष उपस्थिती कार्यक्रमाला होती. आंतरभारती चे राष्ट्रीय सचिव डॉ.डी.एस. कोरे,पुणे शाखेच्या अध्यक्ष अंजली कुलकर्णी, प्रा. शमसुद्दिन तांबोळी, डॉ सतीश देसाई, सूर्यकांत कुळकर्णी , प्रा. अविनाश कोल्हे , प्रा. प्रकाश चौधरी, स्वाती दाढे, शरद जावडेकर, चैत्रा रेडकर आदी मान्यवर उपस्थित होते. डॉ अच्युत गोडबोले म्हणाले की आपण शिक्षण, आरोग्याकडे सतत दुर्लक्ष केले आहे. मुक्त अर्थव्यवस्थेमुळे मध्यम, उच्च मध्यवर्ग प्रगत झाला. पण खालच्या स्तरातील गरीब अधिक गरीब झालेत. मानवी प्रगतीच्या 42 पैकी 40 मानांकनात (इंडेक्स) भारत मागे आहे. सर्व सरकारांना काळा पैसा बाहेर काढण्यात रस नाही. विषमता संपेपर्यंत आर्थिक प्रगती तळातील वर्गापर्यंत पोचणार नाही. या सरकारच्या काळातही प्रगती झाली आहे, पण ती अपुरी आहे. शिक्षण, आरोग्य, सार्वजनिक वाहतूक, स्वस्त गृह बांधणी, उर्जा अशा क्षेत्रात सरकारने पुढील दहा वर्षे प्रचंड काम केले तर सर्वांना प्रगतीच्या समान संधी मिळतील.
लक्ष्मीकांत देशमुख म्हणाले,' जगण्याचा मूलभूत अधिकार घटनेने दिले आहेत. त्याचा संकोच होत आहे. समतेचे स्वप्न पूर्ण होताना दिसत आहे. सरकारांचे मार्गदर्शक तत्वांकडे दुर्लक्ष झाले आहे. आजही सामाजिक लोकशाही प्रस्थापित करू शकलो नाही. निती आणि नियत च्या पकडीत आपण सापडलो आहोत. माहितीचा अधिकार कमकुवत झाला आहे. युएपीए, मनी लॉंडरिंग सारखे फायदे सूडबुद्धीने वापरले जात आहेत. लोकशाहीचा संकोच होत आहे. गोडसेचा उदो उदो होत आहे. धार्मिक ध्रुवीकरण केले जात आहे. आपल्या अधिकारांचे रक्षण आपण केले पाहिजे. पुढील युग यंत्राधिष्ठीत आणि शोषणाचे राहील याची भीती आहे, गरिबांचा कोणी वाली राहील असे वाटत नाही. प्रा. गौतमीपुत्र कांबळे म्हणाले,' आंतर भारती चा प्रयोग देशासाठी महत्वाचा आहे. संविधानाचे अधिकार गरीब, वंचितांना मिळत नाहीत, याचा विचार केला पाहिजे. भारतात सर्व प्रकारची विषमता गाडून समतेवर समाज उभा केला पाहिजे. संविधान अभ्यासून त्याची संहिता अमलात आणली पाहिजे. भारत हा श्रीमंत लोकांचा गरीब लोक असता कामा नये, याचा प्रयत्न केला पाहिजे.
संविधानाबाबत चर्चेपेक्षा प्रयत्नांवर भर दिला पाहिजे. लोक( पर्सन ), आणि नागरिक ( सिटीझन ) यांना असलेले अधिकार वंचितांना कसे मिळतील , याची काळजी केली पाहिजे. भारतात आजही राजरोसपणे अस्पृश्यता पाळली जाते. न्यायपालिका तांत्रिकतेच्या जंजाळात अडकली असून न्याय मिळत नाही. संविधान न वाचलेले लोक बहुसंख्येने आढळतील. नोकरशाहीने संविधान पाळायचे ठरवल्यास देश सुधारण्यास वेळ लागणार नाही. दारिद्र्य रेषेप्रमाणे श्रीमंतीची रेषा ठरवण्याची गरज आहे.सविता कुरुंदवाडे यांनी सूत्रसंचालन केले.



**प्रबोधनपर वैचारिक दिवाळी अंक :** 'आंतर-भारती' या दिवाळी अंकाचे हे पाचवे वर्ष आहे .आंतरभारती ही पूज्य साने गुरुजींच्या विचारांवर आधारित राष्ट्रीय एकात्मता, भारताची बहू धार्मिकता, बहू सांस्कृतिकता, बहू भाषिकता, बंधुता व सहिष्णुता जोपासण्यासाठी आणि प्रबोधनासाठी गेली पन्नास वर्षे काम करणारी स्वायत्त संस्था आहे .प्रबोधनपर वैचारिक दिवाळी अंक ही आंतरभारती दिवाळी अंकाची आता सर्वमान्य व सर्वज्ञात ओळख बनली आहे .



## तीनही ग्रा.पं.वर महाआघाडीचेच सरपंच

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील जासई, दिघोडे चिरनेर आदी तीनही ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत महाआघाडीने भाजपला चितपट केले आहे. तीनही ग्रामपंचायतींमध्ये थेट सरपंचापदासह सदस्यांचाही बहुमताचा आकडा पार करून निर्विवाद सत्ता काबीज केली आहे.उरण तालुक्यातील चिरनेर ग्रामपंचायतीच्या निवडणूकीत महाआघाडी विरोधात भाजप असा सामना रंगला होता. सरपंचासह 17 जागांसाठी पाच प्रभागातुन 30 उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात होते. प्रभाग क्रमांक 4 मधुन महाआघाडीच्या भारती मनोज ठाकूर या याआधीच बिनविरोध निवडून आल्याने महाआघाडीला शुभशकुन मिळाला होता.भाजपच्याच धनदांडग्यांनी केलेल्या अनधिकृत बांधकामांमुळेच मागील काही वर्षांपासून ऐतिहासिक चिरनेर गावाला पावसाळ्यात सातत्याने पुराचा सामना करावा लागत आहे.निवडणूकीच्या प्रचारात प्रमुख मुद्दा बनला होता. याच मुद्यानी भाजपची नौका मतदारांनी अरबी समुद्रात बुडविली. निवडणूकीच्या प्रचारात भाजपच्या महेश बालदी, प्रशांत ठाकूर या दोन्ही आमदारांनीही जाहीर सभा घेऊन मतदारांवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न केला होता. मात्र महाआघाडीचे सरपंचपदाचे उमेदवार भास्कर मोकल यांनी 3128 मतांचा आकडा पार करून भाजपचे नवखे उमेदवार प्रतिक गोंधळी यांना 1904 मतांनी पराभूत केले. प्रतिक गोंधळी यांना 1224 मतांवर समाधान मानावे लागले.तर सदस्यपदाच्या 15 पैकी 14 जागा जिंकून ग्रामपंचायतीवरही निर्विवादपणे सत्ताही काबीज केली आहे. दिघोडे ग्रामपंचायतीत सत्ताधारी भाजप शिवसेना राष्ट्रवादी कॉंग्रेस मनसे महायुती विरोधात कॉंग्रेस, शेकाप आघाडी अशीच लढत झाली. मागील निवडणुकीत ग्रामपंचायतीवर भाजपने शिवसेना शेकापला हाताशी धरून सत्ता स्थापन केली होती. याचाच फायदा उठवत या अगोदर मागचा टर्म वगळता कित्येक वर्षे कॉंग्रेसच्या ताब्यात असलेल्या दिघोडे ग्रामपंचायतीवर कॉंग्रेस - शेकाप आघाडीचे सरपंच पदाचे उमेदवार किर्तीनिधी ठाकूर यांनी 1237 मते मिळवून भाजपचे मयुर घरत यांचा 444 मताधिक्याने पराभव केला आहे.

## ग्रामपंचायत निवडणुकीत भाजप एक नंबर

आधुनिक केसरी न्यूज

**सांगली :** जिल्ह्यात झालेल्या ग्रामपंचायत निवडणुकीत भाजपच नंबर वन ठरला असून निवडणुक झालेल्या ८४ पैकी ३६ ग्रामपंचायतीमध्ये भाजपचा विजय झाला आहे, तर शरद पवार गटाच्या राष्ट्रवादीने १८ ग्रामपंचायतीमध्ये सत्ता हस्तगत करून दुसरे स्थान मिळवले आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनेही शिराळा तालुक्यातील एका ग्रामपंचायतीची सत्ता हस्तगत केली आहे. रविवारी झालेल्या मतदानानंतर आज सकाळी मतमोजणी पार पडली. स्थानिक पातळीवरील निवडणुक असल्याने मोठ्या चुरशीने ही निवडणुक लढविली गेली होती. राज्यात बदलत्या राजकीय समिकरणचे गावपातळीवर काय परिणाम आहेत हे पाहण्यासाठी निकालाबाबत मोठी उत्सुकता होती.
दुसऱ्या टप्प्यातील ९४ ग्रामपंचायतीपैकी १० ग्रामपंचायतीच्या निवडणुका अविरोध झाल्याने ८४ ग्रामपंचायतीसाठी मतदान झाले. आज अंतिम निकाल जाहीर झाल्यानंतर राजकीय बलाबल स्पष्ट झाले. ते असे भाजप- ३६, राष्ट्रवादी शरद पवार गट- १८, राष्ट्रवादी अजित पवार गट- २, शिवसेना शिंदे गट- ६, महाराष्ट्र नवनिर्माण सेना – १, कॉंग्रेस  – २. या निवडणुकीत शिवसेना उध्दव ठाकरे गटाला एकाही ग्रामपंचायतीची सत्ता मिळवता आली नाही. कडेगाव तालुक्यातील चिंचणी गावात कॉंग्रेस तर मायणीमध्ये भाजपची सत्ता आली. सर्वात लक्ष्येवधी ठरलेल्या कुंडल (ता. पलूस) ची सत्ता राष्ट्रवादीने राखली असून आमदार अरूण लाड यांच्या नेतृत्वाखाली सरपंच निवडून आले असून १७ पैकी १४ जागा जिंकल्या आहेत. या ठिकाणी जिल्हा बँकेचे संचालक आणि राज्यमंत्री विश्वजित कदम यांचे मेहुणे महेंद्र लाड यांच्या गटाला केवळ तीन जागा मिळाल्या. आटपाडी तालुक्यातील १५ ग्रामपंचायतीपैकी ९ ग्रामपंचायतीवर आमदार गोपीचंद पडळकर यांच्या नेतृत्वाखालील भाजपने सत्ता संपादन केली आहे. यामध्ये करगणी, नेलकरंजी, मानेवाडी, वाक्षेवाडी, कानकात्रेवाडी, चिंचाळे, आंबेवाडी, मिटकी, काळेवाडी या गावांचा समावेश आहे. तर आमदार अनिल बाबर यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना शिंदे गटाने विभुतवाडी, मासाळवाडी, निंबवडे, पिंपरी खुर्द, पुजारवाडी, आवटेवाडी, मुंढेवाडी या गावात तर अमरसिंह देशमुख गटाने बनपुरीची सत्ता हस्तगत केली आहे. खानापूर तालुक्यात देवनगर, भेंडवडे (गा) या गावात आमदार बाबर यांच्या पॅनेलची सत्ता आली असून साळशिंगे, भेंडवडे (रा) या दोन गावात राष्ट्रवादी अजित पवार गट आणि भाजपचे संयुक्त पॅनेल विजयी झाले.

## मुक्त विद्यापीठाच्या प्र-कुलगुरूपदी प्रा. जोगेंद्रसिंह बिसेन

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या प्र-कुलगुरूपदाचा कार्यभार प्रा. जोगेंद्रसिंह बिसेन यांनी स्वीकारला. यापूर्वी ते नांदेडस्थित स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात प्र-कुलगुरू होते. प्रा. बिसेन यांचे शिक्षण एम. ए., एम. फिल., पी. एच. डी., बी.पी. एड. असून, मागील २७ वर्षे लातुरच्या दयानंद कला महाविद्यालयात हिंदी विषयाचे प्राध्यापक व नंतर प्राचार्य राहिले आहेत. त्यांना महाराष्ट्र शासनाच्यावतीने महाराष्ट्र राज्य हिन्दी साहित्य अकादमीचा छत्रपती शिवाजी महाराज राष्ट्रीय एकता पुरस्कार आणि इतरही अनेक सन्मान प्राप्त झालेले आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० च्या अंमलबजावणीसाठी शासनाच्यावतीने गठीत सुकाणू समितीचे ते सदस्य आहेत. मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले. याप्रसंगी कुलगुरू प्रा. सोनवणे यांनी विद्यापीठाविषयी आणि विविध नवीन उपक्रम व अभ्यासक्रमांबद्दल माहिती दिली. प्र-कुलगुरू प्रा. बिसेन यांनी आपण पारंपरिक विद्यापीठातून आलो असलो तरी, मुक्त विद्यापीठाबद्दल सर्व जाणून घेत जास्तीत योगदान कसे देता येईल आणि विद्यापीठाच्या प्रगतीसाठी प्रयत्न करेल, अशी भावना व्यक्त केली.

## गणोरी शिवारात ८४ हजारांचे दागिने लंपास

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील गणोरी शिवारात २ नोव्हेंबर रोजी दुपारी एका वाजेच्या सुमारास एका घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी घरातील कपाटात ठेवलेले ८४ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने लंपास केले.

या प्रकरणी शुक्रवारी फुलंब्री पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गणोरी येथील गट ७०९ मध्ये संतोष कचरू उबाळे याचे घर आहे. त्यांच्या घरातील सदस्य गुरूवारी सकाळी शेतात कापूस वेचणीसाठी गेले असता अज्ञात चोरट्याने दुपारी एक वाजेच्या सुमारास त्यांच्या घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला.

त्यानंतर घरातील कपाटाचे कुलूप तोडून त्यामध्ये ठेवलेले सोन्याचे झुंबर, नेकलेस, पोत कानातील वेल, पत्ता, चांदीचे कडे, अस एकूण ८४ हजार रुपयांचा ऐवज लंपा केला. याप्रकरणी ३ नोव्हेंबर रो संतोष उबाळे यांनी फुलंब्री पोलि ठाण्यात तक्रार दिली. त्याव पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरो गुन्हा दाखल केला आहे.

## फुलंब्री तालुका दुष्काळग्रस्त घोषित करा

### आमदार हरिभाऊ बागडे यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुका दुष्काळग्रस्त म्हणून घोषित करावा अशी मागणी आमदार हरिभाऊ बागडे यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील फुलंब्री तालुक्यात शेतकऱ्यांच्या खरीप हंगामाच्या पेरण्या पूर्ण झालेल्या असून या वर्षीचे पर्जन्यमान अत्यंत कमी झाले आहे. त्यामुळे पिकांची वाढ झालेली नसून उत्पादन सुद्धा कमी झाले आहे. अशी परिस्थिती असतानाही शासन निर्णय ३१ ऑक्टोबरमधील दुष्काळग्रस्त तालुक्याच्या यादीमध्ये फुलंब्री तालुका वगळण्यात आला आहे. हा तालुका दुष्काळग्रस्त असून जून ते सप्टेंबर या कालावधीतील पर्जन्यमान तूट, उपलब्ध असलेल्या भूजलाची कमतरता, पेरणी खालील क्षेत्र व पिकांची स्थिती अत्यंत चिंताजनक आहे. त्यामुळे या सर्व घटकांचा विचार करून प्रभावित झालेल्या फुलंब्री तालुका दुष्काळग्रस्त घोषित करावा अशी मागणी आमदार हरिभाऊ बागडे यांनी जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे केली आहे.

Contoura Vision
चष्मा नको ?
चष्मा घालवा कायमचा.
डॉ.कांकरिया यांचे
साई सूर्य नेत्रसेवा,अहमदनगर तर्फे



लेसर नेत्र शस्त्रक्रिया शिबीर
'कॉन्टूरा व्हिजन' जगातील सर्वात प्रगत तंत्रज्ञान
मोतीबिंदू ,काचबिंदू , तिरळेपणावर उपचार
दि.१९ नोव्हें.२३, हॉटेल रविराज,बाबा पेट्रोल पंपाजवळ, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)-(सकाळी १० ते १२),
दि.२५ नोव्हे.२३, हॉटेल अन्विता, बीड (सकाळी १० ते १२),
दि.२५ नोव्हे.२३, हॉटेल पार्थ, लातूर (दुपारी ४ ते ६).
विशेष सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया केल्या जातील.
नोंदणी फिस रु.१००
9112288611
8888982222

# अण्णा भाऊंच्या साहित्य प्रकाशनाचा मुहूर्त ठरला

## 9 नोव्हेंबर रोजी प्रकाशन; आधुनिक केसरी जनचर्चेची शासनस्तरावर दखल

आधुनिक केसरी न्यूज




**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र शासनाच्या साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चरित्र साधने समितीच्या सदस्यांनी अण्णा भाऊंच्या साहित्याचे आठ खंडाचे प्रचंड मेहनत घेऊन वेळेत पूर्ण केले. या खंडाचे 1 ऑगस्ट 2023 रोजी प्रकाशन होणार होते. परंतू शासनाच्या उदासीन धोरणामुळे या प्रकाशनाचा मुहुर्त लांबणीवर पडत गेला. त्यामुळे आठही खंडाच्या हजारो कोऱ्या प्रती धूळखात पडून होत्या. याविषयी ' जीवनाचे सम्यक साहित्य मांडणाऱ्या साहित्यरत्नांप्रती शासनाची उदासीनता ' या मथळ्याखाली दि. 17 ऑक्टोबर 2023 च्या अंकात 'आधुनिक केसरी जनचर्चा ' घडवून आणली. या जनचर्चेची शासनस्तरावर दखल घेत अखेर दि. 9 नोव्हेंबर 2023 रोजी कॉन्व्हेंकशन हॉल मुंबई विद्यापीठात राज्यपालांच्या हस्ते प्रकाशन होणार असल्याची माहिती आहे. दैनिक आधुनिक केसरी सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, आर्थिक व वैचारिक मुद्द्यांवर जनचर्चेतून चर्चा घडवून आणत आहे. अलीकडे आधुनिक केसरी जनचर्चा वाचकांत लोकप्रिय ठरली आहे. ' जीवनाचे सम्यक साहित्य मांडणाऱ्या साहित्यरत्नांप्रती शासनाची उदासीनता ; आठ खंड छपाई होऊन पूर्ण तरी प्रकाशनास टाळाटाळ का? ' या मथळ्याखाली दि. 17 ऑक्टोबर 2023 च्या अंकात 'आधुनिक केसरी जनचर्चा ' घडवून आणली. या जनचर्चेत महाराष्ट्रातील साहित्यिक आणि वाचक प्रा. डॉ.सतीश मस्के, शिवा कांबळे, डी.के शेख, बाळासाहेब जोगदंड, किरण डोंगरदिवे, अतुल खंडगावकर यांनी प्रखड मत मांडत उदासीन धोरणावर संताप व्यक्त करीत शासनाने विनाविलंब हे आठही खंड तात्काळ प्रकाशित करून वाचकांना उपलब्ध करून देण्याची मागणी केली. या जनचर्चेची सर्वत्र चर्चा झाली आणि अखेर या जनचर्चेची शासनस्तरावर दखल घेत अखेर दि. 9 नोव्हेंबर 2023 रोजी मुंबईत राजभवनात राज्यपालांच्या हस्ते प्रकाशन होणार असल्यामुळे वाचकांना या आठही खंडांची प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे.




# मनोज पाटील वसंतस्मृती पुरस्काराने सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** विधान परिषदेचे माजी उपसभापती दिवंगत वसंतराव डावखरे यांच्या स्मृत्यर्थ भाजपा शिक्षक आघाडी कोकण विभागाच्या वतीने कोकणातील गुणवंत शिक्षकांना देण्यात येणारा "वसंतस्मृती आदर्श शिक्षक गौरव पुरस्कार"उरण तालुक्यातील पाणदिवे गावचे सुपुत्र मनोज पाटील यांना ठाणे येथे झालेल्या शानदार कार्यक्रमात शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे व पदवीधर मतदार संघाचे आमदार निरंजन डावखरे यांच्या हस्ते नुकतेच गौरविण्यात आले.

मनोज पाटील हे सध्या सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या कळंबोली येथील माध्यमिक शाळेत शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. आज पर्यंत त्यांनी सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, क्रीडा व पत्रकारीता क्षेत्रात उल्लेखनिय कार्य केले आहे. गेल्या वर्षी त्यांना महाराष्ट्र शासनाचा "क्रांतीज्योती सावित्रीमाई राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार" देऊन गौरविण्यात आले होते. मनोज पाटील यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल त्यांचे रायगड जिल्हातून कौतुक होत आहे. या कार्यक्रमप्रसंगी राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण,आमदार संजय केळकर आदी मान्यवर अपस्थित होते.

# कृषि दुकानदारांचा तीन दिवस कडकडीत बंद

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** शासनाने नवीन प्रस्तावीत केलेल्या जाचक कायदया विरोधात निषेधार्थ खुलताबाद तालुक्यातील कृषी विक्रेत्यांनी तीन कडकडीत बंद पाळण्यात आला.प्रस्तावित कायद्यांतील तरतुदी कृषी विक्रेत्यांसाठी अत्यंत जाचक आहे. त्यामुळे कृषी निविष्ठा उत्पादन करित नाही.कृषि विभागांकडून मान्यताप्राप्त उत्पादक कंपन्याचे कृषी निविष्ठा सीलबंद पॅक मधील निविष्ठा दर्जा गुणवत्ता बद्दल दोषी समजण्यात येवू नये. योग्य व पॅक निविष्ठा कृषी विक्रेत्यांवर जरब दवाब बसविण्यासाठी अन्याय कारक कायदे विक्रेत्यांवर लादु नये. यासाठी प्रस्तावित जाचक अन्यायकारक कायद्या विरोधात मुख्य व मोठी गावे टाकळी, सुलतानपूर,गदाना काटशेवरी,वेरुळ,कसाबखेडा, गल्ले बोरगाव, बाजार सावंगी सह छोटे गावांतील ही कृषी प्रतिष्ठान दुकानदारांकडून गत तीन दिवस पासून कडकडीत बंद पाळण्यात आला आहे.

# रेल्वेगाडीत धूम्रपान करणाऱ्यांना दंड

आधुनिक केसरी न्यूज

**गोंदिया :** धावत्या रेल्वेगाडीत सिगारेटचा झुरका घेणे प्रवाशांना चांगलेच महागात पडले आहे. रेल्वे विभागाने विशेष सुरक्षा मोहिमेअंतर्गत रेल्वेगाडीत धुम्रपान करणाऱ्या ९२ प्रवाशांवर कारवाई करून त्यांच्याकडून १८ हजार ४०० रुपये दंड वसूल केला आहे. धावत्या रेल्वेगाडीत धुम्रपान किंवा स्फोटके आणि ज्वलनशील पदार्थांसह प्रवास करणे धोकादायक ठरू शकते. यामुळे रेल्वे मालमत्तेचेच नव्हे तर सहप्रवाशांचेही नुकसान होण्याची दाट शक्यता असते. अशा घटनांना आळा घालण्यासाठी रेल्वे विभागाकडून कारवाई केली जात आहे. तपासणी मोहिमेअंतर्गत ऑक्टोबर महिन्यात धुम्रपानाच्या ९२ प्रकरणांची नोंद करण्यात आली. रेल्वे प्रशासनाने यात १८ हजार ४०० रुपये दंड वसूल केला. धावत्या रेल्वेगाडीत धुम्रपान करू नये, याबाबत रेल्वे प्रशासनाकडून जनजागृती केली जाते. मात्र, या कारवाईमुळे जनजागृतीचा काहीही परिणाम होत नसल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.



# लक्ष्मीनारायण लॉन्स व मंगल कार्यालयाचे साखरवेल येथे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**सय्यद आरेफ़**

**पिशोर :** कन्नड तालुक्यातील साखरवेल येथे नुकताच लक्ष्मीनारायण लॉन्स & मंगल कार्यालयचा उद्घाटन सोहळा पार पाडण्यात आला, या परिसरत तसेच कन्नड पिशोर हायवेय वर हा लॉन्स प्रथमच उभारन्यात आला आहे, तसेच ग्रामीण भागातील जनतेसाठी अल्प दरात हे लॉन्स लग्न समारंभ तसेच विविध कार्यक्रम साठी सुसज्जित करण्यात आले आहे अशी माहिती लॉन्सचे गजाजन घुगे यांनी माहिती दिली आहे.



यावेळी उपमहापौर मनपा संभाजीनगर भाऊसाहेब वाघ, नगराध्यक्ष कन्नड नगरपरिषद स्वातीताई संतोष कोल्हे, समाजसेविका कन्नड उर्मिलाताई मनोज पवार, नगरसेवक कवडे काका , प्रवीण घाडगे, युवा नेते करणभैया उदयसिंग राजपूत, अर्जुन भैया नितीन पाटील, डॉ संजय गव्हाणे, अवचित नाना वळवळे, सुधीर वराडे, डी.एम घुगे साहेब, भरत शेठ चौधरी, पिशोर पोलीस स्टेशन उपनिरीक्षक सतीश बडे,सभापती कन्नड पं. समिती , अप्पाराव घुगे, बापू भाऊ सोमनाथ, सोमनाथ बाविस्कर, गायके सर, सचिन जाधव, आहेर साहेब कन्नड , माजी जि.परिषद सदस्य देविदास काळे, एकनाथ काका पवार, साखरवेल खातखेडा ग्रामपंचायत सरपंच ज्ञानेश्वर पवार, शिवसेना विभाग प्रमुख विलास बापू पवार, माजी सरपंच देवमन घुगे, सोसायटी चेअरमन संजय घुगे, कैलास निर्मळ राजू काका पवार, सरपंच पळशी खुर्द विनोद जाधव , मोबीन पटेल, वासडी सरपंच जंगम, उपसरपंच मच्छिंद्र मुगले, उपसरपंच हस्ता सर्जेराव मेहेगाव, मेहेगाव सरपंच गणेश बोंगाणे, निंभोरा सरपंच भगवानराव गीते, संजय राहुल, राहुल पाटणी, प्रकाश पाटणी, बाबुराव घुगे, अंकुश घुगे, सुनील जयस्वाल, शांताराम घुगे, रामेश्वर घुगे, मुकेश गायकवाड, दत्तू घाटगे , उद्धव पवार , ज्ञानेश्वर खुर्दे, गणेश खुर्दे .रमेश निर्मळ. लक्ष्मणराव घुगे, सोसायटी चेअरमन पळशी खुर्द. साईनाथ जाधव, साखरवेल सोसायटी चेअरमन सजय घुगे, भगवानराव कांजे. अंकुश खुर्दे, इत्यादी पिशोर, खातखेडा, साखरवेल. रामनगर, पळशी खुर्द, देवपुळ, वासडी, निभोंरा, तपोवन, मेहेंगाव हस्ता पंचकृषीतील मान्यवर उपस्थित होते त्याप्रसंगी सूत्रसंचालन गणेश नारायण घुगे यांनी केले व लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयाचे मालक गजानन नारायण घुगे व व राजेंद्र नारायण घुगे यांनी सर्वांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश नारायण घुगे यांनी केले.

# साईबाबा समाधी सोहळ्यानिमित्त आनंदतरंग कलासंचाची साईभजनसंध्या समर्पित

## साईबाबा शिर्डी संस्थानकडून इगतपुरीचे शाहीर उत्तम गायकर यांचा सत्कार !

आधुनिक केसरी न्यूज

**इगतपुरी :** तालुक्यातील आनंदतरंग कलासंचाचे शाहीर उत्तम गायकर आणि सहकारी यांचा "साईभजन संध्या" हा कार्यक्रम सादर करण्यात आला. शिर्डी येथे श्री साईबाबा समाधी सोहळा आयोजित करण्यात आला असून श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था शिर्डीचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी तुकाराम हुलवळे यांनी पत्राद्वारे आनंदतरंग कलासंचास आमंत्रित करण्यात आले होते. श्री साईबाबा यांचे १०५ वी पुण्यतिथी महोत्सव २०२३ मध्ये दसऱ्यापासुन सुरुवात झाली असुन श्री साईबाबांच्या प्रतिमेस पुष्पहार घालुन प्रतिमा पूजन करण्यात आले. साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था शिर्डी यांच्यावतीने सर्व कलावंतांच औक्षण करुन यथोचित सत्कार करण्यात आला. महाआरतीनंतर रात्रौ ७ :१५ ते ९ : ४५ या वेळेमध्ये साईभजन संध्या हा कार्यक्रम श्री साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप येथे सादर समर्पित करण्यात आला. साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव २०१८ साली ही शाहीर उत्तम गायकर आणि सहकारी यांच्या आनंदतरंग कलासंचाने प्रतिथयश ५१ कलावंताच्या संचाने महाराष्ट्राची लोककला साईचरणी सेवा सादर समर्पित केली होती. आनंदतरंग शाहीर उत्तम गायकर यांनी साईबाबांचे सेवाभावी जीवन, एकतेचा मंत्र, आणि श्रध्दा सबुरी तथा मानवता धर्म जातपात विरहित त्यांचे जीवनावर आधारित प्रबोधन भजन सादर करून प्रेक्षकांचे मने जिंकले. साईभजनसंध्या या कार्यक्रमात शाहीर उत्तम गायकर यांच्यासह शंकरराव दाभाडे, शिवाजी गायकर, देविदास साळवे, रामा भोर, रामकृष्ण मांडे, शाहीर नाना परिहार (जालना) महेश भगत, मयुरी पाटील, बाल कलाकार सौम्या महाडिक यांनी सेवा समर्पित केली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थेचे सुनील जाधव, पाटील, प्रवीण वाणी, शाहीर सासवडे, अंकूश थोरात, सुनील डांगे, शुभम सिंग यांनी परिश्रम घेतले.



# कुक्कुटपालन व्यासायिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी गती देणार : मंत्री विखे पाटील

आधुनिक केसरी न्यूज

**विक्रम पासलकर**

**इगतपुरी :** राज्यातील पोल्ट्री व्यावसायिक व खाजगी करारदार विविध कंपन्या यांच्यात व्यवस्थित ताळमेळ बसण्यासाठी गेल्या कित्येक वर्षापासून होत असलेल्या कुकुटपालक व्यावसायिक शेतकऱ्यांचा संघर्ष बघता केंद्र सरकारने ठरवून दिलेल्या गाईड लाइन्स राज्यातील खाजगी कंपन्या पाळत नाहीत. त्यामुळे पोल्ट्री धारक शेतकऱ्यांची मोठी पिळवणूक होत आहे. यासाठी शासनाने गठित केलेल्या राज्य कुकूट समन्वय समितीकडून गेल्या वर्षभरात विविध मागण्या करण्यात आल्या होत्या, यासंदर्भात काल समन्वय समितीची बैठक सह्याद्री अतिथीग्रह मुंबई येथे महाराष्ट्राचे महसूल व पशुसंवर्धन मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, राज्याचे पशुसंवर्धन व कृषी सचिव तुकाराम मुंडे तसेच महाराष्ट्राचे पशूसंवर्धन कमिशनर हेमंत वसेकर यांच्या सोबत विविध विषयांवर चर्चा करीत यशस्वी पार पडली. या बैठकीत राज्यातील सुमारे नऊ लाख पोल्ट्री व्यावसायिकांच्या विविध अडचणी आणि या व्यवसायात करार पद्धतीने पक्षी देणाऱ्या विविध कंपन्यांकडून होणारी पिळवणूक व इतर सर्वच मागण्यांवरती अतिशय सकारात्मक चर्चा होऊन योग्य ते आदेश मंत्री महोदयांनी पशुसंवर्धन विभागाला दिले आहेत.

विशेष म्हणजे दिवाळीनंतर स्वतः पशुसंवर्धन मंत्री विखे पाटील, ग्रामविकास मंत्री व ऊर्जामंत्री गिरीश महाजन यांच्याबरोबर राज्यातील समन्वय समिती व खाजगी कंपन्यायांचे वरिष्ठ अधिकारी असणारे प्रतिनिधी यांची एकत्रित बैठक लावून सबंधित विषय त्या मीटिंगमध्येच कायमस्वरूपी मार्गी लावण्याचे आश्वासन समन्वय समितीला शासनाकडून देण्यात आले आहे. त्यामुळे दिवाळी नंतर पोल्ट्री धारकांच्या अडचणी कमी होण्याचे संकेत शासनाकडून मिळाले आहे अशी माहिती महाराष्ट्र राज्य पोल्ट्री योद्धा संघटनेचे अध्यक्ष आणि समन्वय समिती सदस्य अनिल खामकर यांनी दिली.



राज्यभरातील सुमारे नऊ लाख कुकुटपालक शेतकरी गेल्या अनेक वर्षांपासून कारारदार कंपन्यांना वैतागले असून त्यांच्याकडून होणाऱ्या एकतर्फी करारातील जाचक अटी आणि त्यामुळे कुकुटपालकांचे होणारे आर्थिक शोषण याविरोधात आता कुकुटपाक शेतकरी एकवटले आहेत. व्यावसायात होणाऱ्या कंपन्यांच्या मनमानीपणाला चाप बसावा, एकतर्फी होणाऱ्या कराराच्या प्रक्रियेत सुधारणा व्हावी, ग्रामपंचायत कर लादण्यात येवू नये, वीज बिलात सुट मिळावी, जी सी मध्ये दरवाढ करावी,ग्रामपंचायत कर रद्द करावा, एन ओ सी एकदाच घ्यावी आदिं मागण्यासह पशू खाद्याच्या गोण्यांवर त्यातील सर्व घटकांची माहिती देण्यात यावी व तसा आदेश शासनाने दिला असताना ही कंपन्यांकडून त्याची अमलबजावणी झालेली नाही. या सर्व बाबींचा अहवाल समन्वय समितीच्या सदस्यांनी मंत्री विखे,पशुसंवर्धन सचिव मुंढे, आयुक्त वसेकर यांच्या समोर ठेवला. याबाबत एक वर्षभरापुर्वी 3 नोव्हेबर 2022 मध्ये पुणे येथे पशुसंवर्धन आयुक्त यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक झाली होती. त्यानंतर वर्षभरात कंपन्यानी एकही अट पाळली नसल्याने मंत्री महोदयानी बैठकीत उपस्थित कंपनी प्रतिनिधि यांना जाब विचारला असता त्यांना त्याचे सकारात्मक उत्तर देता आले नाही. म्हणून यामध्ये पशुसंवर्धन सचिव तुकाराम मुंडे, आयुक्त हेमंत वसेकर यांनी आता यापुढे पोल्ट्री व्यवसायासाठी धोरणात्मक निर्णय घेण्यात येईल असे सागितले आहे. त्यामुळे दिवाळी नंतर तत्काळ कंपन्यांचे वरिष्ठ अधिकारी, समन्वय समिति यांच्या बैठकीत कायमस्वरूपी तोड़गा काढला जाणार असल्याचे संकेत मिळाले असून पोल्ट्री वायवसायिक शेतकरी यांच्या दृष्टीने ही जमेची बाजू तयार झाली असून राज्यभरातील पोल्ट्री धारक शेतकऱ्यांनी या विषयी आणि पोल्ट्री योद्धा संघटनेच्या कामकाजाबाबत समाधान व्यक्त केले आहे.

या बैठकीस शासनाच्या राज्य कुकुट समन्वय समितिचे सदस्य व महाराष्ट पोल्ट्री योद्धा संघटनेचे अध्यक्ष अनिल खामकर, सचिव विलास साळवी, शरद गोडांबे, सुदर्शन पोकळे, धनंजय आहेर, एकनाथ मुंगसे, पंढरीनाथ सावळे, शुभम महल्ले, रवींद्र मेटकर, सौ. प्रियंका थिगळे आदीसह कंपण्यांचे सदस्य, प्रतिनिधी उपस्थित होते.

## 'त्याने' घरकूलच काढले विकायला

आधुनिक केसरी न्यूज

**गोंदिया :** पंतप्रधान आवास योजनेंतर्गत २०१८-१९ या वर्षात २ लाख ५० हजार रुपयांचे घरकूल मंजूर झाले. घरकूल बांधून तयार झाले. मात्र अद्यापही त्या घरकुलाचे हप्ते मिळाले नाही. त्यामुळे अखेर कंटाळून त्याने तो घरकूलच विकायला काढले. त्याची परवानगी देवरी नगर पंचायतीकडे मागितली. त्यामुळे नगराध्यक्ष आणि मुख्याधिकारी यांच्यासमोर पेच निर्माण झाला असून ते त्याची समजूत काढण्याचा प्रयत्न करत आहेत. गोंदिया जिल्ह्यातील देवरी शहरातील प्रभाग क्रमांक ९ मध्ये राहणारे चंद्रहास केशोराव लांडेकर यांना २०१८-१९ मध्ये घरकूल मंजूर झाले. त्यांनी घरकुलाचे बांधकाम केले. मात्र अद्यापही त्यांना शेवटचा हप्ता मिळाला नाही.

ज्यांच्याकडून उसनवारी केली, ते आता पैशांसाठी तगादा लावत आहेत. २८८ पैकी १७८ लाभार्थ्यांची देखील हिच स्थिती आहे. वारंवार लाभार्थी नगर पंचायतीत जाऊन शेवटच्या हप्त्याची मागणी करत आहेत. मात्र शासनाकडून पैसे आले नसल्याचे सांगत त्यांना परत पाठविण्याचे काम देवरी नगर पंचायत करत आहे. या प्रकाराला कंटाळून अखेर चंद्रहास केशोराव लांडेकर यांनी आता कर्जाची परतफेड करण्याकरिता आपले घरकूल विकायला काढले असून त्याची परवानी नगर पंचायतीकडे मागीतली आहे. यामुळे नगर पंचायतीपुढे आगळा वेगळा पेच निर्माण झाला आहे. नगर पंचायतीचे अध्यक्ष आणि मुख्याधिकारी घरकुल लाभार्थी चंद्रहास लांडेकर यांची समजूत काढत आहेत. मात्र चंद्रहास आपल्या मागणीवर ठाम असल्यामुळे आता काय करावे, असा प्रश्न नगर पंचायतीपुढे उभा झाला आहे.

मला २०१८-१९ या वर्षी देवरी नगरपंचायत तर्फे प्रधानमंत्री योजने अंतर्गत रुपये २ लक्ष ५० हजार रुपयांचे घरकुल मंजुर झाले. उसनवारी करून बांधकाम पूर्ण केले. सुरूवातीचे दोन हप्ते मिळाले. शेवटचा ३० हजारांचा हप्ता अद्यापही मिळाला नाही. अनेकदा मागणी करूनही टाळाटाळ केली जात आहे. ज्यांच्याकडून उसनवारी केली. ते तगादा लावत असल्याने घर विकण्याची परवानगी मागितली आहे.
**– चंद्रहास लांडेकर (लाभार्थी)**

## वडवाळी ग्रा.पं.वर मंत्री भुमरे गटाचे वर्चस्व

### सरपंचपदासाठी स्वाती काळे विजयी

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** तालुक्यातील एकमेव वडवाळी ग्रामपंचायतीच्या झालेल्या निवडणूकीत पालकमंत्री संदीपान भुमरे यांचे खंदे समर्थक तथा राज्य जिल्हा दूध संघाचे उपाध्यक्ष नंदलाल काळे यांच्या शिवबालाजी ग्राम विकास पॅनलने दणदणीत विजय मिळवला. शिवसेना ( उ.बा.ठा.)भाजप प्रणित प्रतिस्पर्धी पॅनलला फक्त तीन जागेवर समाधान मानावे लागले. एकुन 9 सदस्य पदासाठी वडवाळी गावात दोन पॅनल समोरासमोर उभे ठाकले होते. गावकऱ्यांनी शिवसेना शिंदे गटाचे नंदलाल काळे यांच्यावर विश्वास टाकत त्यांच्या नेतृत्वाखालील पॅनलला भरघोस मताने विजयी केले तर सरपंच पदासाठी स्वाती किशोर काळे ह्या विजयी झाल्या. त्यांच्या परस्परविरोधी प्रतिभा लक्ष्मण खोपडे यांचा ६८ मताने पराभव केला. विजयी पॅनलच्या उमेदवारांनी समर्थकासह पैठण शहर व वडवाळी गावात गुलालाची उधळण करत आनंद उत्सव साजरा केला. यावेळी अरुण काळे,भरत काळे,शाम काळे, गणेश पवार, सखाराम शिंदे, बळीराम जाधव, पांडुरंग जाधव, भिमराव गायकवाड, रमेश भोंडे, भगवान मैदड,किशोर काळे,चंद्रकांत काळे,बाबासाहेब गायकवाड, एकनाथ काळे,यांनी विजयश्री खेचून आणण्यासाठी परीश्रम घेतले. गावकऱ्यांनी आमच्या पॅनलवर विश्वास टाकला यासाठी गावचे नेते नंदलाल काळे, यांनी शेवटी सर्वाचे आभार मानले. वडवाळी येथील काळे कुटुंबात ३५ वर्षापूर्वी संतराम काळे यांनी सरपंच पद भुषवले होते,त्यानंतर त्याची सुन स्वाती काळे यांना जनतेतुन सरपंच झाल्याने काळे परिवारात आनंदाचे वातावरण आहे. या निवडणुकीत भाजपाचे तालुकाध्यक्ष लक्ष्मण औटे यांनी लक्ष घातल्याने वडवाळीची निवडणूक प्रतिष्ठेची ठरली होती परंतु मतदारांनी शिंदे गटाचे नंदलाल काळे यांच्यावर विस्वास दाखवत पँनलच्या माध्यमातून सरपंच व सहा सदस्य निवडणूक दिले. राज्यात भाजपा राष्ट्रवादी,शिवसेना शिंदे गटासोबत काम करते परंतु गाव पातळीवर मात्र शिवसेना ( उ.बा.ठा.) गटासोबत मैत्री करून शिंदे गटाला राजकीय विरोध दर्शवत असल्याचे चित्र पैठण तालुक्यातील वडवाळी झालेल्या ग्रामपंचायत निवडणूकीत दिसून आले.






## डाऊरनगर शाळेस 50 खुर्च्यांची भेट

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** निपुण भारत अभियाना अंतर्गत माता पालक संघाच्या होणा-या शैक्षणिक सभात महिला भगिनींना बसण्याची सोय व्हावी म्हणून वी क्लब ऑफ वुमन द्रोणागिरी आणि तृप्ती सुधीर सुर्वे फाऊंडेशन उरण यांच्या संयुक्त विद्यमानाने डाऊर नगर शाळेस नुकताच 50 खुर्च्यांची भेट देण्यात आली. यावेळेस वी क्लबच्या अध्यक्षा श्लोक पाटील, खजिनदार आरती ढोले, स्वर्गीय तृप्ती सुर्वे फाऊंडेशनच्या अध्यक्षा कल्पना सुर्वे,नम्रता पाटील, शुभांगी शिंदे मुख्याध्यापक श्रीकांत माने,शिक्षक वृंद आदी मान्यवर उपस्थित होते. या वेळेस मान्यवरांचे तंबाखू विरोधी चळवळीवर अधारीत असणारे मच्छिंद्र म्हात्रे यांनी लिहिलेले जागर तंबाखूमूक्तीचा हे पुस्तक देऊन स्वागत करण्यात आले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नाट्यदिग्दर्शक किशोर पाटील यांनी केले. सदर खुर्च्यां डाऊर नगर शाळेस मिळवण्यासाठी शिक्षण प्रेमी नागरिक कैलास भोईर यांनी विशेष प्रयत्न केले.

## दिवाळीच्या तोंडावर ग्रामीण भागात शुकशुकाट

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** दिवाळी मोठा सण तोंडावर असुण ग्रामीण भागात मात्र सर्वत्र शुकशुकाट दिसून येत आहे. यंदा अपुऱ्या पावसामुळे खरिप पिक हंगाम व रब्बी पिक हंगाम दोन्ही पिक हंगाम हातून गेले असुण दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झालेली आहे. त्यात दुष्काळ सदृश्य परिस्थिती असताना व याची सरकारला प्रशासनाकडून माहिती असताना खुलताबाद तालुका दुष्काळ मधून वगळला गेला असल्याने आसमानी संकट बरोबरच सुलतानी संकट ही शेतकरी तथा सर्वसामान्यवर आहे. खरिप पिक हंगाम पावसाअभावी हातातून गेल्याने हातात पैसा नाही शेतीमाल नाही विम्याचे पैसे नाही सरकारी मदत नाही शेतीत खर्च केलेला पैसा मेहनत वाया गेली. हातात काही नसल्याने दिवाळी सण तोंडावर आहे. सणासाठी कुटूंबातील सर्वांसाठी कपडेलत्ते, गोडधोड साठी सामान फटाके रंगरंगोटी खरेदीला पैसा नसल्याने शेतकरी तथा सर्वसामान्य चडीचुप आहे. बाजारपेठात अनेक व मोठ्या प्रमाणात विविध वस्तू उपलब्ध आहे परंतु पैशांअभावी सर्व शुन्य असल्याने ग्रामीण भागात सर्वत्र शुकशुकाट दिसून येत आहे. तर दुकानदारांनी खचाखच माल भरला परंतु ग्राहकच नसल्याने तो ग्राहकांच्या प्रतिक्षेत आहे.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# निरा-शिवतक्रार येथे धम्म रथाचे आगमन

## बौद्ध बांधव, ग्रामपंचायतीच्या वतीने स्वागत

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**निरा-शिवतक्रार :** भारतीय बौद्ध महासभा यांच्या वतीने पुणे जिल्हा पूर्व अंतर्गत 'धम्मरथ' दि.१ नोव्हेंबर ते ११ नोव्हेंबर २०२३ या दरम्यान विविध तालुक्यातील गावा गावात जात असून बौध्द धम्माचा प्रचार आणि प्रसार करण्याचे काम हा धम्मरथ करत आहे. धम्म रथासोबत बौद्ध भिक्खु सुद्धा धम्मदेशना देत आहेत. निरा-शिवतक्रार येथे सायंकाळच्या दरम्यान हा धम्म रथ आल्याने धम्म रथाचे स्वागत निरेतील बौद्ध बांधव, ग्रामपंचायत तसेच ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले. माजी आरोग्य बांधकाम सभापती पुणे जिल्हा परिषद दत्ताआबा चव्हाण, निरा-शिवतक्रारचे उपसरपंच राजेश काकडे, ग्रामपंचायत सदस्य सुनील चव्हाण, संदिप धायगुडे, अभिषेक भालेराव, वर्षा जावळे, सामाजिक कार्यकर्ते सचिन मोरे, दादासाहेब गायकवाड, अमोल साबळे, तात्या जावळे, नाना सोनवणे, रवींद्र काकडे, विजय जावळे व इतरांच्या उपस्थित धम्मरथास हार घालून स्वागत करण्यात आले. तदनंतर बौद्ध भिक्खु यांचे स्वागत अभिषेक भालेराव, अमोल साबळे,नाना सोनवणे, विजय जावळे, शुभम जावळे व उपस्थित महिलांनी केले. निरा शहरातून धम्म रॅली काढण्यात आली. यावेळी बौध्द भिक्खू या रॅलीतून चालत असताना बौध्द बांधवांमध्येच नव्हे तर निरेमध्ये धम्ममय वातावरण बनून गेले. बुद्धं शरणं गच्छामि, धम्मं शरणं गच्छामि, संघं शरणं गच्छामि असा सूर रॅलीतून गुंजत होता. सर्वांनी पांढरेशुभ्र वस्त्र परिधान केले होते. धम्मरथ हा आंबेडकर सोसायटी येथे आल्यावर धम्मदेशना कार्यक्रम संपन्न करण्यात आला. यावेळी पूज्य भन्ते कौंडिण्य व मान्यवरांच्या हस्ते तथागत भगवान गौतम बुद्ध व बोधीसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले.पुज्य भन्ते यांनी धम्म देशना दिली.पूज्य भन्ते कौंडिण्य म्हणाले की, भारत देशातील तमाम लोकांसाठी तथागताचे विचार आणि तथागताचे मानवता उपदेश उपयोगी ठरत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या रुपाने गौतम बुद्धांची समता स्वातंत्र्य बंधूता दिली.तुम्हा आम्हांला हा धम्म जीवन जगण्याचा मार्ग दिला. माणसाला माणूस बनविण्याचं काम बौध्द धम्म करतो.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी तुम्हा आम्हाला संदेश दिलेला आहे की, हा धम्माचा रथ मी मोठ्या कष्टाने आणलेला



आहे. हा धम्माचा रथ तयार करता करता मला इथपर्यंत यायला लागलं आहे. तुम्हाला हा रथ पुढे नेहता नाही आला. तर तो मागे सारू नका. तत्पूर्वी माजी आरोग्य बांधकाम सभापती पुणे जिल्हा परिषद दत्ताआबा चव्हाण, निरा-शिवतक्रारचे उपसरपंच राजेश काकडे, बौद्धाचार्य दादासाहेब गायकवाड व बाळासाहेब पोळ आदींनी मनोगते व्यक्त केले. दत्ता आबा चव्हाण म्हणाले की, बुद्धांचे विचार मानवतेला माणसाचा धर्म जागा करणारा आहे. तुम्ही जिथं जाताल तिथं रिकामे डोकं करून जा, समोरचा माणूस काय बोलतोय ते आपल्याला ऐकता येईल,अन्यथा आपण भरलेल्या घड्यावर किती ही पाणी भरलं तरी घडा हा रिकामाच राहिला जातो. म्हणून बुद्धांनी सांगितलेला हा विचार कुठल्याही माणसाकडून काही शिकायचे असेल तर अहंमपणा आणि मी पणा पहिला सोडला पाहिजे. त्यांनी दुसरा विचार सांगितला की तुम्ही सगळ्यांचं ऐका, पण विचार करताना, म्हणणं मांडताना आपल्या बुद्धीला तोलून विचार स्वतःच्या बुध्दीने विचार मांडायला हवा. बुद्धाचे विचार माणसाला मानवतेकडे नेहणारे आहेत. यावेळी अरुण सोनवणे,बाळासाहेब पोळ,अनिल म्हसने, रामराव गायकवाड,बापू सरोदे आदी उपस्थित होते. कार्यक्रम प्रसंगी तथागत भगवान गौतम बुद्धांचा विजय असो, बोधीसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा विजय असो असा जयघोष करण्यात आला. अरुण कापरे या युवकाने स्वतःची गाडी ही धम्मरथास दिल्याने सर्वांच्या समोर भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने विशेष कौतुक करण्यात आले. सूत्रसंचालन राज राजरतन थोरात यांनी केले. स्वागतपर मनोगत ग्रामपंचायत सदस्य अभिषेक भालेराव तर आभार प्रदर्शन अमोल साबळे यांनी मांडले. कार्यक्रमास निरेसह जेऊर, मांडकी, गुळूंचे, पिसुर्टी, निंबुत, पिंपरे, पाडेगाव, लोणंद आदी भागातील लोकं उपस्थित होते.

## रेशन कार्डधारकांना धान्याऐवजी थेट रोख

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील व सावळदबारा परिसरातील शेतकऱ्यांनी आप आपल्या नजीकच्या रेशन दुकानात कागदपत्रे त्वरित जमा करावे असे आवाहन सोयगाव तहसीलदार मोहनलाल हरणे यांनी केले आहे. शेतकरी योजनेतील शिधापत्रिका धारकांना अन्न धान्य ऐवजी थेट बँक खात्यात रोख जमा करण्याची रक्कम हस्तांतरण योजना नवीन वर्षांपासून सुरु करण्यात येत असून त्यासाठी दि.७ नोव्हेंबर प्रत्येक रास्तभाव दुकानात कागदपत्रे जमा करण्याची एक दिवसीय शिबिर आयोजन रेशन मालक शुभंम गोंडबे सावळदबारा यांच्याकडे जे वंचित असतील त्यांनी जमा करण्यात यावे. याचा लाभ शिधापत्रिका धारकांना घ्यावे असे आवाहन तहसीलदार मोहनलाल हरणे व पुरवठा अधिकारी नाना मोरे यांनी केले आहे. शासन निर्णय २८ फेब्रुवारी २३, अधिनियम २०१३ अनुवय समाविष्ट न झालेले एपीएल केशरी शिधापत्रिका धारक शेतकरी लाभार्थींना नवीन वर्ष जानेवारी २०२४ पासून प्रतिमहा अन्न धान्य ऐवजी प्रतिमहा १५०/- रुपये लाभ रक्कम हस्तांतरण थेट रोख रक्कम बँक खात्यात योजना सुरु करण्याचे आयोजन असुण त्यासाठी शेतकरी एपीएल केशरी शिधापत्रिका धारकांच्या कागदपत्रांसाठी दि.७ रोजी रास्तभाव दुकानात एक दिवसीय शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. यात कुटूंबातील सर्वांचे आधारकार्ड व महिला सदस्यांचे बँक खात्याची प्रत शिबिरात जे वंचित असतील त्यांनी जमा करावयाची आहे. या शिबीर तथा योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन सोयगाव तहसीलदार मोहनलाल हरणे व पुरवठा अधिकारी नाना मोरे यांनी केले आहे.

## वाळू डेपोची घोषणा हवेतच, अवैध वाळू उपसा वाहतूक विक्री जोरात

### वाळूसाठी नागरिकांची भटकती

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** सरकारच्या वाळु डेपो घोषणे नंतर खुलताबाद तालुक्यात अद्याप वाळु डेपोचा कोठेच पत्ता नसुण वाळु डेपोची नागरिकांतून प्रतिक्षा आहे. तर सरकारची ती घोषणा वाऱ्यातच विरली असुण वाळू साठी नागरिकांची भटकती सुरुच आहे. मात्र अवैधरित्या वाळू उपसा व विक्री प्रशासनाच्या आशिर्वादाने तालुक्यात जोरदारपणे सुरू आहे.हे विशेष. अवैध वाळु उपसा तथा चोरीची नव्हे तर सरकार कडून माफक दरात वाळुडेपोद्वारे खरेदी करण्यासाठी सरकारने घोषणा केली खरी परंतु अनेक महिने उलटले तरी अद्याप तालुक्यात किंवा मोठ मोठ्या गावात वाळु डेपोचा कोठेही थांगपत्ता नाही. नागरिकांना बांधकामांसाठी सद्या वाळु मिळत नाही. त्यामुळे अनेक बांधकामे ठप्प व  बंद पडून आहे. तर सर्वसामान्यांच्या बांधकामा साठी चोरटी वाळु खरेदी करणे आवक्या बाहेर असल्याने सर्वसामान्य जागीच चुरमुट्या देवून आहे. तर चोरट्या मार्गाने येणारी वाळु रात्री अपरात्रीच मिळते. चोरटी वाळु वाहतुक करनारे नाले खोले नद्या कोरोन कारुन माती मिश्रीत वाळु चढ्या भावाने विक्री करत असल्याने बांधकाम करणाऱ्यांना ती वाळु परवडत नाही. परंतु ना इलाजस्तव त्याचा वापर सर्वसामान्य करत आहे. त्यात महसूल व पोलीस प्रशासन चोरटी वाळु वाहतूक करणाऱ्यांवर टिपून बसल्याचे चर्चा असते व त्यामुळे अवैध चोरटी वाळु विक्रेत्यांचे धाबे दणाणले आहे. महिने दोन महिन्यांतून एखादं कारवाई करण्यात येती परंतु तरी तालुक्यात ठिकठिकाणी रात्री अपरात्री सर्रास उघडपणे वाळु उपसा करून अवैधरित्य वाढीव दराने वाळू विक्री सुरु आहे. तालुक्यात काही ठिकाणी तर वाळु साठा ही दिसून येईल.  यापुर्वी महसूल प्रशासनाकडून दंडात्मक कार्यवाही झाल्याने चोरटी वाळु वाहतूकदार जागृत झाले होते.वाळुमाफीयांना महसुल व पोलिस प्रशासनाचे कोठून व कसी कार्यवाही होईल याचा अंदाज येत नसल्याने ते घाबरून आहे. महसुल वाळु पथक व पोलिस प्रशासन वाळु ला घेवून सतर्क दिसतात तरी तालुक्यात अवैध रित्या वाळु उपसा वाहतूक विक्री कसी सुरू राहते हा न उलगडणारा प्रश्न आहे. सर्वसामान्याना सद्या वाळु मिळेनसी झाली आहे. सरकारची वाळु डेपो घोषणा हवेतच व  फक्त घोषणाच ठरत असल्याने वाळुला घेवून नागरिक तथा बांधकाम करते परेशान झाले व वैतागले असुण शासनाने तातडीने वाळु डेपोचा प्रक्रिया सुरू करावी असी मागणी होत आहे.

## ॲड. सुनिल जाधव यांची संयोजकपदी नियुक्ती

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** पांगरी गोसावी येथील ग्रामीण भागातील तालुका मंठा एका शेतकरी कुटुंबातील उच्चशिक्षित ॲड. सुनिल जाधव यांची मराठवाडा विभागावर नियुक्ती, अभाविप पूर्व कार्यकर्ते विद्यार्थी चळवळीतून आलेलं नेतृत्व तसेच यावेळेस डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर, सिनेट पदवीधर निवडणुक लढलेले ॲड. सुनिल जाधव यांची नियुक्ती महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपा प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखरजी बावनकुळे यांच्या मान्यतेने मराठवाडा विभाग संयोजक योगेशजी जगताप यांनी ॲड. सुनिल जाधव यांची मराठवाडा विभाग भाजपा पदवीधर प्रकोष्ट सह संयोंजक पदी नियुक्ती केलेली आहे. एका ग्रामीण भागातल्या कार्यकर्त्यांना विभागावर काम करण्याची संधी दिल्याबद्दल पक्ष श्रेष्ठींचे मनापासून आभार व्यक्त करतो. आगामी काळात भारतीय जनता पार्टीचे विचार तळागाळापर्यंत पोहोचण्याचा आणि पदवीधरांचे प्रश्न सोडवण्यासाठी आणि न्याय, हक्क मिळवून देण्यासाठी सदैव तत्पर राहील, असे नवनियुक्त ॲड. सुनिल जाधव यांनी सांगितले .



गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

## वाशीम बाजार समितीत सोयाबीनला मिळाला हंगामातील उच्चांकी दर

आधुनिक केसरी न्यूज

**वाशीम :** बाजार समितीमध्ये सोयाबीनला  या हंगामातील उच्चांक दर मिळाला आहे. प्रती क्विंटलला सोयाबीनला 5 हजार 451 रुपयांचा दर मिळाला आहे. सोयाबीन  उत्पादक शेतकऱ्यांसाठी ही दिलासा देणारी बातमी आहे. गेल्या वर्षभरापासून पडलेल्या सोयाबीनच्या दरात  सुधारणा झाल्याचं चित्र आज वाशिम  बाजार समितीमध्ये पाहायला मिळाले. वाशीम बाजार समितीमध्ये सोयाबीनला यावर्षीच्या हंगामातील उच्चांकी दर मिळाला आहे. प्रति क्विंटलसाठी 5451 रुपयांचा दर  मिळाला असल्याने शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे. गेल्या वर्षभरापासून 4 हजार 200 ते 4 हजार 800 दरम्यान विक्री होणाऱ्या सोयाबीनला ऐन सणासुदीच्या काळात दरवाढ झाल्याने  शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पाहायला मिळत आहे. येत्या काळात दरवाढ होण्याच्या शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहे. वाशीम बाजार समितीमध्ये आज 15000 क्विंटल सोयाबीनची आवक झाली होती. गेल्या काही दिवसापूर्वी दरात झाली होती घसरण गेल्या काही दिवसापूर्वी सोयाबीनच्या दरात कमालीची घसरण झाल्याचे चित्र पाहायला मिळाले होते.  शुभारंभालाचा सोयाबीनला कमी दर मिळत असल्यानं सोयाबीन उत्पादक शेतकरी संकटात सापडला होता. राज्यातील काही जिल्ह्यात सोयाबीनला 3 हजार 800 ते 4 हजार 100 रुपयांचा प्रति क्विंटलला दर मिळत होता. या मिळालेल्या दरात शेतकऱ्यांना नफा तर सोडात पण त्यांचा उत्पादन खर्चही निघत नाही.



त्यामुळं शेतकऱ्यांनी संताप व्यक्त करत होते. अशातच वाशिम बाजार समितीमधून एक दिलासादायक बातमी समोर आल्याने शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले. केंद्र शासनाने सोयाबीन तेल आणि डीओसी आयात करण्याचे धोरण जाहीर केले आहे. तेल आणि सोयाबीन ढेप आयात होत असल्याने बाजारात सोयाबीनचे दर पडले आहेत. पुढील काळात हे दर काय असतील हे सांगणे सध्या तरी अवघड आहे. दसरा दिवाळी या सणांच्या तोंडावर महागाई कमी करताना शेतकऱ्यांच्या शेत-मालावर त्यांचे गंभीर परिणाम होतानाचे चित्र बाजारात पहायला मिळत आहे. यातून शेतकयांना आर्थिक नुकसानीचा सामना करावा लागत आहे.